RNI NO. MAHMAR/2020/84035





BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ



उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451



रविवार, १८ मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १४० | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Sunday, 18 May 2025 | Year : 5 | Issue : 140 | Daily | Rate: Rs. 5/-


## ऑपरेशन सिंदूर : लष्करी कारवाईचा राजकीय फायद्यासाठी प्रयत्न



# भाजपने तिरंगा यात्रा तर काँग्रेसची जय हिंद सभा

**नवी दिल्ली :** भारतीय लष्कराने दाखवलेल्या शौर्याचा आणि केलेल्या त्यागाचा सन्मान करण्यासाठी हे या यात्रेचे प्रयोजन आहे, असे भाजपाच्या नेत्यांकडून सांगण्यात आले. काश्मीरची राजधानी श्रीनगरसह इतर शहरांमध्ये या यात्रा सुरुही झाल्या. हे पाहून काँग्रेसही भाजपापेक्षा फार मागे राहिली नाही. एका प्रकारे भाजपच्या यात्रेला प्रत्युत्तर म्हणून काँग्रेसनंही आता त्यांच्या पक्षातर्फे भारतभर 'जय हिंद' सभांची घोषणा केली आहे. 20 ते 30 मे दरम्यान देशातल्या विविध शहरांमध्ये या सभा होणार आहेत, असे काँग्रेसकडून सांगण्यात आले. एकीकडे भाजप आणि काँग्रेस हे दोन्ही राष्ट्रीय पक्ष म्हणत आहेत की, देशाच्या लष्कराच्या धैर्याला सलाम म्हणून आम्ही या यात्रा करतो आहोत, पण त्यातला राजकीय हेतू लपून राहिला नाहीय. भाजपला त्यांच्या नेतृत्वाने दाखवलेली निर्णयक्षमता, आक्रमकता, पहलगाम हल्ल्याला दिलेले प्रत्युत्तर, पाकिस्तानला शिकवलेला धडा आणि ते करण्यात आलेल्या यशाचा दावा, हे सगळे लोकांपर्यंत नेऊन ते श्रेय आपल्या पदरात पाडून घेण्याची इच्छा आहे. तिकडे काँग्रेसला सैन्याच्या कौतुकासोबतच सरकारला जाहीर प्रश्नही विचारायचे आहेत. 'सुरक्षेत राहिलेल्या त्रुटी, सरकारला राष्ट्रीय सुरक्षेत आलेले अपयश आणि या सगळ्या प्रकारात अमेरिकेने केलेला हस्तक्षेप याबद्दलचे प्रश्न त्यांच्या 'जय हिंद' सभांमधून काँग्रेस विचारणार आहे,' असे काँग्रेसचे महासचिव के सी वेणुगोपाल यांनी 'एक्स'वर पोस्ट करुन म्हटले आहे.

युद्ध किंवा युद्धजन्य परिस्थितीत एका प्रकारची देशभावना जागी होते. ती सगळ्यांना या काळात एकत्र आणते. या भावनेचा आणि त्यातून तयार झालेल्या 'राष्ट्रवादा'चा राजकीय उपयोग जगाच्या इतिहासात अनेकदा छोट्या वा मोठ्या प्रमाणावर केलेला पाहायला मिळतो. त्यामुळे जेव्हाही अशी स्थिती तयार होते, त्याभोवती राजकारणही फिरू लागले. भारतही त्याला अपवाद नाही. भारत पाकिस्तान संघर्ष उभा राहिला आणि त्यानंतर लगेचच राजकीय प्रतिमावर्धनाचे प्रयत्न पाहायला मिळाले. वास्तविक सर्वपक्षीय बैठकीत पहलगाम हल्ल्यानंतर जे कोणते पाऊल केंद्र सरकार प्रत्युत्तर म्हणून उचलेल त्याला पाठिंबा असेल, असं विरोधी पक्षांसहित सगळ्यांनी सांगितले होते. त्यामुळे या काळात राजकीय कुरघोडीचे कोणतेही प्रयत्न होणार नाहीत, असा समज सर्वांचाच होता.

पण फार काळ तशी स्थिती राहिली नाही. सुरुवात सत्ताधारी भाजपकडून झाली. 7 मे 2025 च्या पहाटे 'ऑपरेशन सिंदूर' सुरू झाल्यानंतर एका दिवसाच्या अंतराने, म्हणजे 9 मे 2025 रोजी, भाजपच्या अधिकृत 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) या समाजमाध्यमावरील पोस्टमधून थेट पूर्वीच्या 'यूपीए' आणि माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारवर निशाणा साधला गेला. एका छोटेखानी व्हीडिओत हे दाखवले गेले की, 'यूपीए'च्या काळात किती हल्ले झाले होते, त्यात किती मृत्यू झाले होते आणि त्याचा कोणता बदला घेतला गेला नाही. पुढे त्या व्हीडिओत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा उल्लेख करुन त्यांनी शांततेची चर्चा करण्यापेक्षा प्रत्युत्तर दिले, असे म्हटले. त्यात मोदींना 'मॅन विथ मिशन' म्हणतांना रोख काँग्रेसकडे होता. भाजपच्या अनेक नेत्यांनीही त्यानंतर समाजमाध्यमांवर अशा प्रकारच्या पोस्ट लिहिल्या. त्यावरुन वाद सुरू झाले. महाराष्ट्रातून केंद्रात राज्यमंत्री असणारे मुरलीधर मोहोळ यांनीही अशाच प्रकारची पोस्ट लिहिली आणि त्यावरुन टीकाही मोठी झाली. तोपर्यंत काँग्रेस या प्रकारच्या राजकीय सवाल-जबाबात पडली नव्हती. ती पडली, जेव्हा भारत आणि पाकिस्तानमध्ये संभाषण होऊन शस्त्रसंधी झाली तेव्हा. जेव्हा 11 मे 2025 रोजी दुपारी पहिल्यांदा बोलणी होऊन दोन्ही बाजूंनी लष्करी कारवाई थांबवण्यात आली, त्यानंतर एक वेगळंच 'राजकीय' अभिनिवेशाचे युद्ध समाजमाध्यमांवर आणि मुख्य माध्यमांवर या काँग्रेस आणि भाजपाकडूनही लढले गेले. राष्ट्रवादाचे, त्यातही सांस्कृतिक राष्ट्रवादाचे राजकारण करणाऱ्या भाजपवर त्यांचे विरोधी पक्ष सातत्याने अशी टीका करतात. लष्करी बळ, जशास तसे उत्तर, पाकिस्तानला धडा हे मुद्दे आक्रमकपणे भाजपच्या प्रचारात पूर्वीपासून राहिले आहेत. त्यामुळे आताही जेव्हा युद्धजन्य स्थिती निर्माण झाली हे मुद्दे आलेच. जेव्हा आता भाजपतर्फे 'तिरंगा यात्रा' काढल्या जात आहेत, त्यातही हा प्रचार आहे.

## यूट्यूबर निघाली ISIची एजंट



**नवी दिल्ली :** सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सक्रिय असलेली हरियाणातील प्रसिद्ध यूट्यूबर ज्योती मल्होत्रा हिला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. गुप्तचर सूत्रांनुसार, ज्योती मल्होत्रावर पाकिस्तानी गुप्तचर एजंट्सला संवेदनशील माहिती पुरवल्याचा गंभीर आरोप आहे. माहितीनुसार, 2023 मध्ये ज्योती मल्होत्राने कमिशनद्वारे पाकिस्तानचा व्हिसा मिळवला आणि ती तिथे गेली होती. याच काळात पाकिस्तान उच्चायोगात कार्यरत असलेल्या दानिश नावाच्या कर्मचाऱ्याशी तिचे जवळचे संबंध निर्माण झाले. सूत्रांचे म्हणणे आहे की, याच ठिकाणी तिचा पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणांशी संपर्क सुरू झाला. गुप्तचर यंत्रणांचा दावा आहे की, भारतात परतल्यानंतरही ज्योती मल्होत्राने पाकिस्तानी एजंट्सशी सतत संपर्क ठेवला आणि विविध माध्यमांद्वारे भारताशी संबंधित संवेदनशील माहिती शेअर केली. या कृतीमुळे देशाच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. असे सांगितले जाते की, ज्योती पाकिस्तानातून परतल्यानंतर भारतीय गुप्तचर यंत्रणांनी तिच्यावर नजर ठेवण्यास सुरुवात केली होती. काही काळापासून तिच्या ऑनलाइन सर्च माहिती, परदेश दौरे आणि संपर्कांची तपासणी केली जात होती. पुरेसे पुरावे मिळाल्यानंतर तिला अटक करण्यात आली.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणाचा अमेरिकेला फटका?



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून अनेक निर्णयांचा धडाका लावला आहे. या निर्णयांमध्ये बेकादेशीरपणे अमेरिकेत राहणाऱ्यांना हद्दपार करण्यासह जगातील अनेक देशांवर टॅरिफ (आयातशुल्क) लागू करण्याचा निर्णयांचा समावेश आहे. खरे तर आयातशुल्क लागू करण्याच्या निर्णयानंतर अनेक देशात त्याचा मोठा परिणाम झाल्याचे पाहायला मिळाले. त्यानंतर अनेक देशांनी या संदर्भात नाराजी देखील व्यक्त केली. त्यानंतर अखेर डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफचा निर्णय तात्पुरता स्थगित केला. दरम्यान, जगभरात अद्यापही टॅरिफबाबत मोठी चर्चा सुरू आहे. असे असतानाच आता अमेरिकेबाबत एक महत्वाची बातमी समोर आली आहे. जगातील अव्वल संस्थांपैकी एक असलेल्या पतमापन संस्था 'मूडीज'ने डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का दिला आहे. मूडीजने अमेरिकेचे क्रेडिट रेटिंग शुक्रवारी एका अंकाने कमी केल्याची माहिती समोर आली आहे. या मागचे कारण वाढते कर्ज आणि व्याज देयकासंदर्भातील कारण देत अमेरिकेचे क्रेडिट रेटिंग एका अंकाने कमी करण्यात आल्याचे 'मूडीज'ने सांगितले आहे.

## केंद्राच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळात शशी थरूर यांचे नाव पाहून काँग्रेस अवाक्



**नवी दिल्ली :** दहशतवादाविरोधातील भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी केंद्र सरकारने सात सदस्यीय सर्वपक्षीय शिष्टमंडळाची स्थापना केली आहे. हे शिष्टमंडळ जगभरातील प्रमुख देशांचा दौरा करून तेथे भारताची भूमिका स्पष्टपणे मांडणार आहे. मात्र या शिष्टमंडळामध्ये शशी थरूर यांचा समावेश करण्यात आल्याने काँग्रेस अवाक् झाली आहे. पहलगाममध्ये झालेला दहशतवादी हल्ला, त्यानंतर भारतीय सैन्य दलांनी ऑपरेशन सिंदूर राबवत त्याचा घेतलेला बदला, पुढे भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेला संघर्ष आणि युद्धविराम, या सर्व घडामोडींमुळे भारतीय उपखंडामध्ये मागच्या महिनाभरापासून कमालीचे तणावपूर्ण वातावरण निर्माण झालेले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरही भारताकडून पाकिस्तान आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात आक्रमक भूमिका घेण्यात आली आहे. दरम्यान, दहशतवादाविरोधातील भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी केंद्र सरकारने सात सदस्यीय सर्वपक्षीय शिष्टमंडळाची स्थापना केली आहे. हे शिष्टमंडळ जगभरातील प्रमुख देशांचा दौरा करून तेथे भारताची भूमिका स्पष्टपणे मांडणार आहे. मात्र या शिष्टमंडळामध्ये शशी थरूर यांचा समावेश करण्यात आल्याने काँग्रेस अवाक् झाली आहे. आपण दिलेल्या चार नावांपैकी कुणाचाच या शिष्टमंडळात समावेश केलेला नाही, असे काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी म्हटले आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश म्हणाले की, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी 16 मे रोजी सकाळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना फोन केला होता. त्यात त्यांनी पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाबाबत भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी परदेशात पाठवण्यात येणाऱ्या सर्वपक्षीय शिष्टमंडळामध्ये समावेश करण्यासाठी चार नावे सुचवण्यास सांगितले होते. त्यानुसार मल्लिकार्जुन खर्गे आणि राहुल गांधी यांनी संसदीय कार्यमंत्र्यांना पत्र लिहून आनंद शर्मा, गौरव गोगोई, सय्यद नासिर हुसैन आणि राजा बरार यांची नावे सूचवली होती. मात्र केंद्र सरकारने या चारही नावांना वगळून काँग्रेस पक्षाच्या वतीने शशी थरूर यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. दरम्यान, या सर्वपक्षीय शिष्टमंडळाचे नेतृत्व शशी थरूर हे करणार असून. या शिष्टमंडळामध्ये भाजपाचे रविशंकर प्रसाद आणि बैजयंत पांडा, जेडीयूचे संजय कुमार झा, डीएमकेच्या कनिमोळी, शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे आणि शिवसेना शिंदे गटाचे श्रीकांत शिंदे यांचा समावेश आहे. याबाबत मिळत असलेल्या अधिक माहितीनुसार, हे शिष्टमंडळ अमेरिका, ब्रिटन, दक्षिण आफ्रिका, कतार आणि संयुक्त अरब अमीरातसारख्या देशांचा दौरा करणार आहे. हा परदेश दौरा 22 मे पासून सुरू होण्याची शक्यता आहे.

## सरकार पुस्तकांना वाचनीय वस्तू समजते की प्रेक्षणीय?

**अमरावती :** पुस्तकांची गावे उभारणे, विश्व मराठी संमेलने आयोजित करणे आणि कोट्यवधी व लाखो रूपयांचा खर्च अशा केवळ प्रेक्षणीय बाबींसाठी करत, वाचन संस्कृती, ग्रंथ संस्कृती यांच्या मूळ गरजा व कार्य विस्तार याकडे मात्र सपशेल दुर्लक्ष करत जाणे, ही नवीनच कार्यशैली स्वीकारण्याचा जो छंद सध्या सरकार जोपासत आहे, तो थांबवावा आणि राज्याला ग्रंथ धोरण देत, संबंधित क्षेत्राच्या आवश्यक गरजांची पूर्ती करण्यासाठी पुनः एकदा मुळातून अग्रक्रम निश्चित करावे, अशी मागणी मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळीतर्फे करण्यात आली आहे. सरकारने उपलब्ध करून दिलेल्या नुकत्याच आलेल्या माहितीनुसार पुस्तकांची गावे ही जणू प्रेक्षणीय पर्यटन स्थळे असल्याच्या थाटात पुस्तकांच्या गावाला भेट देणाऱ्यांची संख्याच तेवढी सरकार सांगत आहे, यावरून सरकार पुस्तकांना वाचनीय वस्तू समजते की प्रेक्षणीय असा प्रश्न उपस्थित होतो आहे. पुस्तकांच्या गावांची योजना ही केवळ पर्यटन स्थळी ते गाव बघण्यासाठी जाणाऱ्यांनी तिथेही भेट द्यावी यासाठी आहे की, पुस्तक हाताळणे, वाचणे, समजून घेणे आणि त्याद्वारे पुस्तक आणि वाचक यांचे नाते दृढ करण्यासाठी आहे की, केवळ गाव बघण्यासाठी हे सरकारने स्पष्ट करण्याची गरज आहे, असे मत मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळीचे प्रमुख संयोजक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी व्यक्त केले आहे.




## अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे ग्रामीण भागात गोंधळ...



**चंद्रपूर :** अकरावी वर्गाचा प्रवेश यावर्षी ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालकांमध्ये गोंधळाची स्थिती आहे. दहावीचा निकाल लागला असला तरी गुणपत्रिका अद्याप मिळालेली नसल्याने आणि प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी 19 ते 29 मे या दहा दिवसांच्या कालावधीत असल्याने आणि त्याबाबत शिक्षण विभागाने जनजागृती केली नाही.

दहावीच्या सीबीएससी, आयसीआयसी आणि महाराष्ट्र बोर्डाच्या परीक्षेचे निकाल लागले आहेत. मात्र अद्यापही विद्यार्थ्यांना गुणपत्रिकाच मिळालेल्या नाहीत. आजवर अकरावीचे प्रवेश महाविद्यालयस्तरावर होत होते. मुख्याध्यापकांनी या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना माहिती देऊन जागृती करावे असे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात दहावीचे निकाल लागले तरी शहरी व ग्रामीण भागात अनेकांना याबाबत माहिती नाही. येत्या 19 मे पासून चंद्रपूर जिल्ह्यात अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू होणार असून ती 29 मे पर्यंत चालणार आहे. या दहा दिवसात जिल्हाभरातील विद्यार्थ्यांची नोंदणी होईल का याबाबत साशंकता आहे. अनेक महाविद्यालयानी आपले महाविद्यालयाचे नाव देखील ऑनलाईन मध्ये नोंदविलेले नाही. आता नाव नोंदणीसाठी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू आहे. ऑनलाईन प्रवेशाची नोंदणी सबंधित महाविद्यालयामध्ये करता येईल अशा सूचना होत्या मात्र महाविद्यालयांकडून या ऑनलाईन प्रवेशसाठी नोंदणी केंद्रच उघडलेले नाहीत, असेही सांगण्यात येत आहे.

## 'रूट रिले इंटरलॉकिंग'चा 21 मे रोजी रेल्वेला सर्वाधिक फटका

**नागपूर :** नागपूर रेल्वे स्थानकावरून देशाच्या चारही दिशांना रेल्वेगाड्यांचे आवागमन होत असते. त्यामुळे नागपूरच्या चारही बाजूला तिसरा आणि चौवथा रेल्वे मार्ग तयार करण्यात येत आहे. आता नागपूर रेल्वे स्थानकावर 'रूट रिले इंटरलॉकिंग'मध्ये बदल करण्यात येत असल्याने आणि तिसरा रेल्वे मार्ग सुरू करण्याची चाचणी घेण्यात येत असल्याने नागपूर आणि इतवारी रेल्वे स्थानकांवरून धावणाऱ्या काही रेल्वेगाड्या उशिरा धावत आहेत. मुंबई-हावडा आणि दिल्ली-चेन्नई अशा देशातील चार महत्वाच्या शहरांना जोडणाऱ्या रेल्वेगाड्या नागपूरमार्गे धावतात. याशिवाय कोळसा, मॅग्निज आणि लोखंडाची मोठ्या प्रमाणावत वाहतूक होते. त्यामुळे नागपूरच्या चारही दिशांकडे जाणारे रेल्वेमार्ग अत्यंत व्यस्त आहे. आता तिसरा रेल्वे मार्ग टाकण्याचे काम वेगात सुरू आहे. त्यानंतर चौथा रेल्वे मार्ग तयार करण्यात येणार आहे.





संत गाडगेबाबा बहुउद्देशीय आश्रम जरूड
बुद्ध विहार समन्वय समिति द्वारा आयोजित
बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर
राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर
रविवार २५ मई से १ जून, २०२५ आठ दिवसीय निवासी शिबीर
शांतीवन चिंचोली (फेटरी) नागपूर (महाराष्ट्र)
बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर (१०० बाल-बालिका, उम्र १३ से १६ साल)
राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर (५० भारत के नागरिक, उम्र १८ से ७० साल, अंग्रेजी, हिंदी, मराठी भाषामें
* पालि भाषा प्रशिक्षक *
आचार्य राजेंद्र भालशंकर (नाशिक)
* मुख्य संयोजक *
सतिश गायकवाड / बबिता गायकवाड
८९९९९६०७९३ / ९९७००८३४३७ / ९६६५६१४३४१
* मुख्य आयोजक *
अशोक सरस्वती बौद्ध / प्रा. डॉ. प्रमिला चिंचखेडे
मो. ८५३०९८०७४१ / ८७८८६०७३२३
आपली नाव नोंदणी करा. (निशुल्क)
अपना नाम दर्ज करने की कृपा करे (निशुल्क)


## शिक्षकांवर भर उन्हाळ्यात 'निपुण महाराष्ट्रा'चे ओझे !




**अमरावती :** वर्षभरापासून अनेक उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षण विभागाने सातत्य राखले असताना आता भर उन्हाळ्यात शिक्षकांच्या डोक्यावर निपुण महाराष्ट्र अभियान कृती कार्यक्रमाचा भार दिल्याने शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर आहे.

शालेय परीक्षा संपल्यानंतर पालकांचे आपल्या पाल्यांसह उन्हाळी सुट्ट्यांचे नियोजन असते. त्यामुळे बहुतांश विद्यार्थी बाहेर असतात. अशावेळी उन्हाळी शिबिराचे नाव देऊन निपुण महाराष्ट्र अभियानाच्या कृती कार्यक्रमाला किती विद्यार्थ्यांची शालेय उपस्थिती असेल यावर शंका व्यक्त केली आहे. निपुण महाराष्ट्र अभियान कृती कार्यक्रमातून विद्यार्थ्याला घराच्या बाहेर पाडायला भाग लावणे हे धोकादायक असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. निपुण महाराष्ट्र अभियान कृती कार्यक्रमात शासनाने दिलेल्या लिंकवर एकूण 20 प्रकारची माहिती शिक्षकांना भरावयाची आहे. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांचे 6 मे 2025 चे पत्र आणि जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण अधिकारी यांनी पंचायत समिती गटशिक्षण अधिकारी यांना निर्देशित केलेल्या आदेशात म्हटले आहे की, राज्यातील दुसरी ते पाचवीच्या वर्गातील शालेय विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वृद्धिंगत करण्याकरिता निपुण महाराष्ट्र अभियान व त्या अंतर्गत प्रस्तुत कृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शालेय वेळेमध्ये कृती कार्यक्रम सर्व शाळांमध्ये सुरू आहे. या उपक्रमांतर्गत अल्पकालीन शैक्षणिक शिबिराद्वारे विद्यार्थ्यांमधील संभाव्य शैक्षणिक तफावत भरून काढण्यास मदत होईल आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत सातत्य राखले जाऊ शकेल.




"एक पाऊल आर्थिक सक्षमतेकडे .....!"
बानाई क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि. नागपूर
रजि. नं. : एनजीपी/आरएसआर/सीआर/1546/2024
पत्ता : प्लॉट नं. 311-A, बेझनबाग प्रगतीशिल कामगार गृहनिर्माण संस्था, जिंजर मॉल जवळ, जरीपटका बस रोड, नागपूर - 440014
कार्यालयीन फोन नं. : 0712-4079005
आपल्या स्वप्नांना आकार देणारी संस्था
१४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ते १२ मे बुद्ध जयंती पर्यंत च्या कालावधीत विशेष सवलती योजना.

सावधी जमा योजना (FD) विशेष व्याज दरामध्ये उपलब्ध

| कालावधी | सर्वसाधारण | जेष्ठ नागरिक व महिला |
|---|---|---|
| 1 वर्ष | 7.75 % | 8.25 % |
| 2 वर्ष | 8.00 % | 9.00 % |
| 3 वर्ष | 8.25 % | 9.25 % |

सुलभ कर्ज सुविधा झिरो प्रोसेसिंग फी सह उपलब्ध

पतसंस्थेत चालु असलेल्या इतर योजना
१) बचत खाता (Saving Account)
२) मासिक आवर्त ठेव योजना (RD)
३) मासिक आय योजना (MIS)
४) दैनिक बचत योजना (SSD)
५) वैयक्तिक कर्ज योजना (Personal Loan)
६) सोने तारण योजना (Gold Loan)
७) गहाण कर्ज योजना (Mortgage Loan)
८) सावधी जमा योजना (Fixed Deposit)
या योजनेच्या सर्व नागरिकांनी अवश्य लाभ घ्यावा.

विश्वास हाच आमचा पाया... आणि तुमचा आर्थिक उत्कर्ष हेच आमचं ध्येय

संपर्क : अनुप कुमार सांगोडे (अध्यक्ष) मो. 9423686121 अनिल बहादुरे (उपाध्यक्ष) मो. 9890216150 व्यवस्थापक : मो. 9665863188

# हिंदुत्वाची भयंकरता; मध्यप्रदेश प्रयोगशाळा!




**मध्यप्रदेशची नवी ओळख आकार घेतेय. 'हिंदुत्वाची प्रयोगशाळा!' इथली सत्ता हा प्रयोग करतेय. त्यात सातत्य आहे. रोज जे कानावर येतेय ते त्याचेच दाखले समजावेत.**

इथे राज्य भाजपचे आहे. एकछत्री राज्य! दीर्घ वर्षे झालीत. संघाचा प्रभाव आहे. सध्या मुख्यमंत्री मोहन यादव हे आहेत. दक्षिण उज्जैन येथून निवडून येतात. तिसरी वेळ आहे. बी एससी, एम बी ए, पीएच डी आहेत. विद्यार्थी परिषदेतून आले. साठ वर्षाचे आहेत.

मोहनराव जोरात आहेत. सारे ठरवून सुरू आहे. अलीकडे नामांतराचा सपाटा लावलाय. गाव, शहर, वस्ती, ठिकाणची मुस्लिम नावे पुसून टाकायची. तशी लाट आलीय. की आणलीय? लोकांनी मागणी केली की नाव बदलले. असे सुरुय. नवे नाव हिंदूधार्जिणी! मुख्यमंत्री तिथेच घोषित करतात. सपाटा लागलाय.



**रणजित मेश्राम**
**मो. 9890020789**

या सपाट्यात मुरादपुरचे मुरलीपूर, इस्लामनगरचे ईश्वरपूर, अलीपुरचे रामपूर, नबीपुरचे नयापूर, मिर्झापूरचे मीरापूर, मुरादपुरचे मुरलीपूर, हैदरपुरचे हिरापूर, शमशाबादचे श्यामपूर नावे झालीत. अशी शेकडो नावे बदलण्यात आली आहेत. ते सुरुच आहे.

याशिवाय रस्त्याची नावे बदलली. नवी नावे राम पथ, सीता पथ, लक्ष्मण पथ, भरत पथ, कन्हैया पथ, अशी झालीत. जुन्या मंदिराचे पुनःनिर्माण जोरात सुरु आहे. नवीन मंदिर निर्माणाचा झपाटा लागलाय.

हिंदुत्वाची झिंग अशी अशीच असते. लोक याच कैफात आहेत. तिथे आर्थिक प्रश्नांना थारा नसतो. किंबहुना तो रकानाच नसतो.

हे नामांतरण सुरु असतांना दुसऱ्या तशाच प्रकृतीच्या हालचाली या राज्यात सुरु आहेत. ग्वाल्हेर उच्च न्यायालय परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा अनावरण भिजत पडलेले आहे. 4-5 महिने लोटून गेले. 11 फुटाची प्रतिमा कापडात गुंडाळून आहे. 'नाही उभारु देणार' आवाज मोठा आहे. नवनवे आक्षेप पुढे केले जातात.

शिल्प तयार झाले, 'हायकोर्ट' परिसरात चबुतरा तयार झाला हे विनापरवानगीने होईल काय? शक्य तरी आहे काय? शिल्प उभारणारे आंबेडकर प्रेमी वकील कमी पडले. विरोधी आवाजाने आता चबुतऱ्यावर तिरंगा रोवला. वाद भलतीकडेच नेलाय.

विशेष म्हणजे ग्वाल्हेरचे खासदार भाजपचे आहेत. शेजारच्या गुनाचे खासदार केंद्रात मंत्री आहेत. राज्याचे मुख्यमंत्री ओबीसी आहेत. अन् .. न्यायालय परिसरात आंबेडकर अडकले आहेत!

असे राज्याच्या या प्रयोगशाळेत सुरू आसतांनाच .. नुकतेच इथल्या आदिवासी मंत्र्याने देश हलवून टाकला. धाडकन कोसळावे तसे ते बोलले. मानबिंदू ठरलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांना अशोभनीय उपमा दिली. अजबगजब बोलून गेले. आता चुकून झाले म्हणतात.

हे मंत्री साधेसुधे नाहीत. आठ वेळचे आमदार आहेत. यांना 'कुंवर' म्हटले जाते. गोंड जमातीवर यांचे प्रभुत्व आहे. यांना हात लावणे भाजपला अवघड झालेय. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय यांनी टिप्पणी करुनही आदिवासी मंत्री कुंवर विजय शाह मोकळे आहेत.

याच बोलरांगेत आता इथलेच उपमुख्यमंत्री उभे आहेत. ते म्हणतात, 'देशाची सेना व देशाचे लोक .. प्रधानमंत्रीप्रती नतमस्तक आहेत!' व्वा! धन्य उपमुख्यमंत्री जगदीश देवडा!

हे बोलघेवडेपण उगाच असेल काय? विवादित टिप्पणी इथपर्यंतच हे मर्यादित नाही. यांच्या मानसिकतेतून ती प्रसूती आहे. प्रसुतीलाच प्रस्तुती म्हणूया. ही सारी कट्टर हिंदुत्वाची भयंकरता आहे.

यांना, राज्याला प्रयोगशाळा म्हणणे अभिमानास्पद वाटते. संविधानाची प्रयोगशाळा अद्याप ऐकले नाही. हिंदुत्वाची प्रयोगशाळा हे ऐकायला येते. उत्तराखंड ही स्वतःला तसे म्हणवून घेतोय.

प्रयोग यशस्वी झाला की, दुसरीकडे तो लागू होतो. या प्रयोगशाळेतच हिंदूराष्ट्र दडलेले आहे. हिंदुकरण जेव्हा संघीकरणाकडे वळते तेव्हा अशा उक्तीकृती घडतात. आव्हाने मोठी असली तरी ती अज्ञानातून आहेत. नक्की सरतील. जागरण तेव्हढे कौशल्यपूर्वक अखंड सुरू ठेवावे लागेल. हा पहिला उपाय ठरू शकेल! ■ ■

# मागासवर्गीयांचे कळीचे मुद्दे सोडविणे गरजेचे...

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेच्या चळवळी ला थोडेफार यश येत असताना. विषमतावादी प्रस्थापित लोक अडथळा निर्माण करतात. समता प्रस्थापित करण्यासाठी मुख्य म्हणजे मागासवर्गीय समूहाची शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक प्रगती झाली पाहिजे. जेव्हा हा समाज भरघोस प्रगती करेल तेव्हा इतरांच्या मनातील विषमतेची भावना नष्ट होईल. असे गृहितक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले आहे. म्हणूनच त्यांनी आरक्षण हे समतेसाठी आहे म्हटले आहे. वैचारिक मुद्दे बरेच आहेत. त्यावर अधिक न बोलता मूळ समस्या खालील प्रमाणे उजागर करून, याकडे सर्व कार्यकर्ते व लेखक विचारवंत यांचे लक्ष वेधून इच्छितो.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने अनुसूचित जाती जमाती आणि ओबीसी मुलानी पदवी घेतली परंतू नोकरी लागत नाही. ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे ड्रॉप आऊट चे प्रमाण वाढले आहे. शिक्षनाकडे निरुत्साह निर्माण होत आहे. म्हणून सरकारने सुशिक्षित बेकारी दूर करावी. कारण नोकऱ्या न लागणे ही गंभीर समस्या आहे. त्यासाठी सरकारने कंत्राटी पद्धत बंद केली पाहिजे. सरकारने शासकीय उपक्रमाचे खाजगीकरण केल्यामुळे आरक्षण नष्ट होत आहे. खाजगीकरण करणे बंद करावे. जे खाजगीकरण झाले त्याचे परत राष्ट्रीयकरण करावे.

* खाजगी संस्था, कंपनी, दवाखाने व सर्व उद्योगात सुद्धा आरक्षण हवे. खाजगी शाळा व विद्यापीठात आरक्षण देऊन भरले पाहिजे. त्यासाठी शासनाने काटेकोर नियोजन करावे.

केंद्र व राज्य शासकीय आस्थापना, विद्यापीठ इत्यादीमध्ये असलेल्या आरक्षित रिक्त जागा तातडीने भरल्या पाहिजे.

* आट्रॉसिटी कायदा निष्प्रभ होत आहे. पोलिस स्टेशन मध्ये तक्रार नोंद करण्यासाठी आंदोलन करावे लागते. तसेच आरोपी कडून अनुसूचित जाती जमाती च्या फिर्यादी विरुद्ध काउंटर फिर्याद दाखल करण्यात येते. हे गैरप्रकार थांबले पाहिजे. अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायदा सरकारने सक्षमपने राबवावा.

* अनुसूचित जाती जमातीसाठी क्रिमी लेअर लावून अडथळे आणले जात आहे. ते बंद करा. क्रिमिलेअर अनुसूचित जाती जमातीसाठी लागू करू नये. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात पूर्ण फी माफी मिळावी.

* शिक्षणक्षेत्रातील जातीयवाद भेदाभेद बंद झाला पाहिजे विद्यापीठ अनुदान आयोग यांनी सक्षमपणे हा कायदा करावा व विद्यार्थ्यांना संरक्षण द्यावे.

* अनुसूचित जाती आणि जमाती यांना उद्योग सुरू करण्यासाठी विनातारण व जामीनदाराशिवाय कर्ज मिळाले पाहिजे. कर्ज देताना क्लिष्ट अटी शर्ती नसाव्यात.

* बौद्धांना केंद्र सरकारचे अनुसूचित जातीचे आरक्षण घेण्यासाठी महार लिहावे लागते. ते आरक्षण बौद्ध म्हणून मिळाले पाहिजे.

* विदेशी शिष्यवृत्तीची संख्या केंद्र व राज्य सरकारने वाढविली पाहिजे म्हणजे अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे.

* दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती शिष्यवृत्ती योजना आहे परंतु दरमहा शिष्यवृत्ती दिली जात नाही. पूर्वी दिली जायची. वर्ष पूर्ण होईस्तोवर शिष्यवृत्ती मिळत नाही. त्या मुळे मुलांना विवंचना

* सहन करावी लागते. तरी प्रवेश घेताच शिष्यवृत्ती द्यावी. पूर्वी काही कॉलेज मध्ये तसे होते. त्यामुळे गरजू विद्यार्थी पुस्तके, शालेय वस्तू व कपडे विकत घेऊ शकत होते.

* महाराष्ट्रातून अनुसूचित जातीच्या जात पडताळणीसाठी व जातीच्या दाखला मिळविण्यासाठी 1950 पूर्वीचा पुरावा दाखला ही अट आहे. ती रद्द व्हावी. गाव सोडलेल्या बौद्ध व इतर अनुसूचित समूहाच्या लोकांना 1950 चा पुरावा मिळणे कठीण होत आहे. त्यामुळे काही लोक जात प्रमाणपत्रा पासून वंचित होतात.

जात पडताळणी प्रमाण पत्र पद्धत फक्त महाराष्ट्रात आहे. इतर राज्यात नाही. त्यामुळे अनुसूचित जातीची महाराष्ट्रातील जात पडताळणी अट रद्द करा. फक्त नोकरीच्या नियुक्तीसाठी व राजकीय निवडणुकीसाठी लागू ठेवावी.

* अनुसूचित जातीची महिला असेल तर तिच्या मुलांना तिच्या दाखल्या आधारे जात प्रमाण पत्र मिळावे कारण पती दाखला देत नाही म्हणून पीडित महिला मुलांना जातीचा दाखला मिळवून देवू शकत नाही. आईच्या दाखल्यावर जात प्रमाणपत्र देण्याचा कायदा नाही. तो करावा.

* गरज नसेल तेथे जातीचा रकाना नसावा. बँकेत खाते उघडताना, सरकारी दवाखान्यात, पोलिस स्टेशन, न्यायालयात केस दाखल करतांना इत्यादी ठिकाणी जातीचा रकाना आहे. त्याची गरज नाही. तो बंद करावा.




* मागासवर्गीय विद्यार्थी लेखी परीक्षामध्ये उत्तम गुण मिळवून मौखिक परीक्षामध्ये नापास करतात म्हणून नोकरीच्या ठिकाणी फक्त लेखी परीक्षा आधारे निवड व्हावी. तोंडी परीक्षा रद्द करण्यात यावी.

* अनुसूचीत जाती जमाती या मुलांना कोणत्याही शिक्षण संस्थेत प्रवेश घेण्यासाठी फी मागू नये. तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी सरकार फी देत नाही. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी सरकारने फी द्यावी. अनुसूचित जाती जमाती विद्यार्थ्यांकडून मेडिकल, इंजिनिअरिंग इत्यादी पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी फी घेऊ नये. खाजगी संस्था असेल तर त्यांची फी सरकारने भरावी. सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमास समाजकल्याण विभागाने महाविद्यालयाची फी भरावी.

* अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांची खाजगी इंग्लिश मिडीयम कॉन्व्हेन्ट शाळेची फी वर्ग 1 ते 12 पर्यंतची सरकारने भरावी.

* अनुसूचित जातीचे मुला मुलींचे वसतिगृह कमी पडत आहेत. जागा कमी पडतात म्हणून प्रत्येक जिल्ह्यात अधिक वसतिगृह सुरू करावे.



**अनिल वैद्य**
माजी न्यायाधिश
9657758555

* पाली भाषा हा पेपर केंद्रीय व राज्य लोकसेवा आयोगाने पूर्वी सारखे लागू करावे.

* सरकारने पाली भाषा पदवी व पदव्युत्तर शिक्षण देशातील प्रत्येक जिल्ह्यात उपलब्ध करावे .

* सरकारने पदव्युत्तर एम ए आंबेडकर विचारधारा एम ए बौद्ध अध्ययन व पाली भाषा हे अभ्यासक्रम प्रत्येक जिल्ह्यात उपलब्ध करावे. तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठमध्ये उपलब्ध करावे.

* सर्व न्यायालयात न्यायाधीश व कर्मचारी यांना आरक्षण लागू करण्यात यावे.

* बुद्ध गया महाबोधी महाविहार मुक्त करावे व बौद्धांच्या ताब्यात द्यावे.

* जेथे कोठे बौद्धांनी सरकारी किंवा महानगर पालिका जागेवर विहार बांधले असेल किंवा पंचशील ध्वज लावला असेल तर ती जागा बौद्ध धम्म श्रद्धा स्थान म्हणून हक्क नोंद करावी. असे श्रद्धा स्थान अतिक्रमण समजू नये. ते बौद्धांना पूर्ववत करून द्यावे. हे काम राज्य सरकारने करून द्यावे. अशी जागा सार्वजनिक उपक्रमासाठी अतिशय आवश्यक असेल व त्यासाठी पर्यायी जागा सरकारला मिळत नसेल तरच सरकारने बौद्धांना विहारासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी. असे पर्यायी नवीन विहारचा सरकारने बांधकाम खर्च द्यावा.

* प्रत्येक गावात बौद्ध वस्तीवर अन्याय अत्याचार होणार नाही यासाठी शांतता समिती स्थापन करावी. सरकारने अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत कायदा सुव्यवस्थेची प्रशासकीय खबरदारी घेतली पाहिजे. या कायद्याच्या नियमावलीत तरतुदी आहेत. त्याची अंमलबजावणी व्हावी.

* धर्मांतर विरोधी कायदा बौध्द धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तीस लागू करू नये. कारण बौद्ध धम्म हा स्वखुषीने स्वीकाल्या जातो. ही वस्तुस्थिती लक्षात घ्यावी.

* अनुसूचित जाती जमाती चे वर्गीकरण करणे बंद व्हावे. वर्गीकरणामुळे या समूहात दूही निर्माण होईल.

* अनुसूचित जाती जमाती कर्मचारी बढती बाबतचा तिढा सोडवून साविधानिक तरतुदींचे पालन तातडीने करण्यात यावे.

* रस्ते व इमारत बांधकाम इत्यादी कंत्राट देताना अनुसूचित जाती, जमाती, ओबीसीसाठी आरक्षण देण्यात यावे.

* डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व साहित्य सर्व भाषेत प्रकाशित करावे. किंवा इतर राज्य व इतर देशांना त्यांच्या भाषेत प्रकाशित करण्यासाठी सरकारने विनंती करावी. हे महत्वाचे मुद्दे सोडविणे गरजेचे आहे. या शिवाय अधिक समस्या सुद्धा आहेत. वरील पैकी शिक्षण व नोकरी हे अत्यंत महत्त्वाचे व कळीचे विषय आहेत. मागासवर्गीय आमदार, खासदार, मंत्री, अधिकारी आहेत. तसेच मागासवर्गीय समाजाचे सर्व नेते, कार्यकर्ते आणि लेखक यांनी सर्वांनी लक्ष दिले पाहिजे. कल्याणकारी लोकशाही व्यवस्था भारताने स्वीकारली आहे. जातीभेद नष्ट करण्यासाठी या उपाययोजना आहेत. सरकार कोणत्याही पक्षाचे असू द्या! कायद्याने सरकार जनतेचे आहे ही भावना असावी. त्यांच्याकडे समस्या मांडल्या पाहिजे. आमदार, खासदार, मंत्री व अधिकारी यांनी टेबल वर्क करून समस्या सोडवून घेतल्या पाहिजेत. सर्व संघटना,नेते व लेखक विचारवंत यांनी या विषयाला प्राथमिकता दिली पाहिजे. समता प्रस्थापित करण्यासाठी हे कळीचे मुद्दे सोडविणे गरजेचे आहे. ■ ■

लेखांक १११



**अशोक सरस्वती बोधी**
**मो. 8530980741**

# सर्व समदुःखितांनी समन्वय करावा हाच उपाय!

मूलतत्त्ववाद जेव्हा वरचढ होऊन तो सत्तेवर दीर्घकाल असतो तेव्हा तो उन्मादी होतो. त्यावेळी सत्तेच्या माध्यमातून गुलामगिरीची सुरुवात होते. ते कायद्याला, संविधानाला जुमानत नाहीत. त्यांच्या उन्मादी झुंडी झुंडशाही निर्माण करीत असतात. सत्ता त्या झुंडशाहीला समर्थन देते. नावापुरती निवडणूक, लोकशाही, न्यायालय, कायदा, संविधान हे आभासी दिसून येते. आज हे वातावरण तंतोतंत दिसून येत आहे. म्हणून सर्व समदुःखी लोकांनी गंभीर विचार केला पाहिजे.

**गंभीर विचार म्हणजे काय? :-** सर्व अंगांनी दूरदृष्टी ठेऊन आणि आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी भावनिक न होता, पूर्वग्रह सोडून नियोजन करावे. समदुःखी कोण हे स्पष्ट करावे, त्यानंतर त्याची निःस्वार्थीपणे, अंमलबजावणी करावी. साधनांची जुळवाजुळव करावी. साथीदारांना प्रशिक्षित करावे. उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत कार्य करावे याला मी गंभीर विचार करणे म्हणतो.

**गुलामांना गुलामीची जाणिव करून द्या :-** शत्रू फार चावट आणि कपटी आहे. ज्यांना गुलाम करायचे आहे त्याच लोकांना ते वापरतात. इतिहासातील हिंदू कोड बिल प्रकरण आठवा. ज्या महिलांसाठी ते बिल होते त्यांनाच पुढे करून डॉ. आप्पासाहेब मुंजे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विरोधात मोर्चा काढायला लावला. आता वर्तमानात अशीच घटना घडली. ज्या महात्मा ज्योतिबा फुले यांनी महिलांच्या मुक्तीसाठी जीवन खर्ची घातले, त्यांचेवर काढण्यात आलेल्या चित्रपटाविरोधात पुण्यातील महिलांना विरोध करायला लावला. स्वतःच्या आईची हत्या करणाऱ्या पापी परशुरामाची महिलांकडून जयजयकार करून घेतात. मंडल आयोग ज्या ओबीसी करीता होता त्याच ओबीसी समाजाला पुढे करून गुजरातमध्ये आरक्षण विरोधी आंदोलन करून दलित समाजावर अन्याय, अत्याचार केले. जो राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप पक्ष आणि परिवार दलित, आदिवासी, ओबीसी, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि महिलांचे विरुद्ध कटकारस्थान करतो, त्यांचेच सोबत हे पीडित लोक जातात. हे वास्तव आहे. त्यांचे धडावर ब्राम्हणांचे डोके आहे, हे लक्षात घेऊन त्या बहकलेल्या आपल्या समदुःखी समाजाला शत्रू न समजता त्यांना जागृत करून आपल्या सोबत घ्यावे लागेल. त्याशिवाय आपण गुलामी विरुद्ध लढू शकणार नाही. हा लढा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक या सर्वच पातळीवर लढावा लागेल. तो दीर्घकालीन लढा आहे हे समजून सांगावे लागेल.

**यासाठी पुढाकार कुणी घ्यावा? :-** गुलाम समाज हा असंघटित आणि गाफील असतो. एकाएकी तो सत्य समजून घेईल ही अपेक्षा करता येत नाही. या दलीत, आदिवासी, ओबीसी, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध वर्गात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानणारा जो कोणी असेल त्यांची ही जबाबदारी आहे. त्यांनीच पुढाकार घ्यावा. त्यांनीच त्याग करावा. त्यांनीच संघटन बांधावे. त्यांनी मागे राहून इतरांना म्हणजे ओबीसी, आदिवासी यांना समोर करावे. तरच हा लढा यशस्वी होऊ शकतो. कोणताही एक जात वर्ग हा लढा यशस्वी करू शकत नाही.

**शत्रूपासून तरी शिका :-** मोदी आणि शहा हे ब्राम्हण नाहीत. त्यांचेपेक्षा दिग्गज ब्राम्हण विद्वान नेते भाजपात असताना त्यांनी दोघा ब्राम्हणेतर प्याद्यांना समोर केले. राष्ट्रपती आदिवासी महिला केली. यांचे हातून यांचेच लोकांचे हक्क हिरावून घ्यायची ही यांची रणनीती आहे. हे तिघेही परिवर्तन विरोधी आणि ब्राम्हणांचे मानवी बॉम्ब आहेत. आम्ही मात्र कुणाला प्यादा बनऊ नये, कुणाचा वापर करू नये. पण त्यांचे खांद्यावर नेतृत्व द्यावे. तेव्हाच हा लढा एका जातीचे कोंडवाड्यातून खुला होईल. ते असत्यासाठी समर्पित, त्यागी, शिस्तीत आहेत. आपल्याला हे कुणी शिकवले नसले तरी आपण निरिक्षणातून तरी त्याग, समर्पण, शिस्त, नियोजन शिकलो पाहिजे.




**सर्वच जातीत परिवर्तनवादी :-** आज सर्वच जाती धर्मात गुलामी विरुद्ध जागृत लोक आहेत. आपण त्यांना केवळ जयंती, स्मृतिदिनाला भाषण करायला बोलावतो. पण त्यांना घेऊन चळवळ बांधत नाहीत. ही उणीव आम्ही भरून काढली पाहिजे.

**शत्रू आज नको तेवढा स्पष्ट झाला :-** राम मंदिर झाल्यावर तेथे ब्राम्हणेतर नाही. शिक्षण बंद करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. प्रगतीसाठी पैसा न वापरता फालतू कामासाठी खर्च केला जातो. लाडकी बहीण हे त्याचे उदाहरण.

**आपण नेहमी समस्येवर नुसती चर्चा करतो हे आपल्या लक्षात आलेच असेल. समस्या समजून सांगणे, त्याबद्दल जागृती करणे आवश्यक असतेच. पण त्याचे रडगाणे होता कामा नये. आज लोकांना रडगाणे करण्याची संवय झाली. त्याचा काहीही परिणाम होत नाही. म्हणून त्यावर उपाय शोधून अंमलात आणला पाहिजे.**

एस.सी./ एस.टी./ ओ.बी.सी. साठी बजेटमध्ये ठरवलेला निधी वापरल्या जात नाही. यू.पी.एस.सी. लेखी परीक्षेत ब्राम्हणेतर मुले ब्राम्हणांचे समोर आहेत. तोंडी (देखी) परीक्षेत त्यांना मागे करण्यात आले. लॅटरल एन्ट्रीमुळे आमची मुले अधिकारी होऊ शकत नाहीत. सर्व ब्राम्हण तेथे गेलेत. या बाबीमुळे शत्रू नागडा झाला. केवळ त्याची कपटी चाल समदुःखिताना सांगावी लागेल. सतत सतत सांगत राहावे लागेल.

**त्यागा शिवाय अशक्य :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारणी सभा सर्व समाजातील सुधारकांना घेऊन काढली होती. रिपब्लिकन पक्ष सर्व जात धर्मातील लोकांचा व्हावा यासाठी डॉ. बाबासाहेबांनी खुले पत्र प्रसिद्ध केले होते. कांशीराम साहेबांनी उत्तर प्रदेशात धोबी, न्हावी, कुंभार, सुतार, लोहार, खाटीक, ढीवर अश्या अत्यल्प अकरा जातीतील अकरा लोकांना चांभारांचे बळावर निवडून आणले आणि मंत्री देखील केले. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी देखील दलितेतर लोक विधान सभेत निवडून पाठविले होते. या प्रयत्नांना आणखी विकसित केले तर सर्व समदुःखी लोक एकत्र येतील. रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष मुसलमान, शीख, ख्रिस्चन, आदिवासी का करू नये?

**देशाची जात धर्म अवस्था दुर्लक्षित करू नका :-** जे आहे ते मान्य करा. त्यानुसार नियोजन करा. रिपब्लिकन सोडून प्रत्येक पक्षाने प्रत्येक जातीचे चेहरे आपापल्या पक्षात तयार केले. ते आम्हाला तयार करता आले नाही. बसपाने नागपूर जिल्हा अध्यक्ष सुरेश केकातपुरे नावाच्या धोबी समाजाच्या तरुण मुलाला केले होते. अमरावती जिल्हा महादेवराव कळसकर माळी समाजाचे, बाळू गावंडे यवतमाळ जिल्ह्याचे, वर्धेत पैदलवार धोबी समाजाचे, भंडाऱ्यात कुणबी समाजाचे गोविंदराव ब्राम्हणकर अध्यक्ष होते. असे प्रत्येक जिल्ह्यात दलितेतर नेते तयार केले होते. ही प्रक्रिया 1984 ते 2005 पर्यंत होती. ती किमया रिपब्लिकन पक्षाला करता आली नाही. त्यांना त्याची खंत देखील नाही. ती बुद्धिमत्ता देखील नाही. म्हणून ते संपले. लोक त्यांना सोडून गेले. नेते टिनमनी वाजवत फिरत राहतात. याला शामदादा गायकवाड अपवाद ठरतात. वंचित बहुजन आघाडीने त्याचे अनुकरण केले आणि त्यांनी जनाधार देखील तयार केला.

**हे आज होऊ शकते :-** जेव्हा लोकांवर संकट आले हे त्यांचे लक्षात येते तेव्हा त्यांना जाग येते. कार्ल मार्क्स असे म्हणतात, 'जेव्हा एखाद्या व्यवस्थेचा अतिरेक होतो तेव्हा त्यातच त्याच्या नाशाची बीजे पेरली असतात.' आज ही परिस्थिती किमान बुद्धीजिवी लोकांच्या तरी लक्षात आली. त्याचा परिणाम 2024 ला लोकसभा निवडणुकीत भाजपला बहुमत मिळाले नाही. त्यातूनही भाजपने काही धडा घेतला नाही. म्हणून देश आणि समाज तसेच संविधान आणि लोकशाही याबद्दल देश संवेदनशील आहे हे त्यांच्यापर्यंत योग्य मार्गाने नेता आले पाहिजे. हे करावे लागेल आणि समदुःखी लोकांचा सामाजिक आणि राजकीय समन्वय घडवून आणावा लागेल. ती जबाबदारी परिवर्तनवादी लोकांची आहे. ■ ■




# संग्रहालय दिन
## ज्ञान आणि संस्कृतीचा उत्सव

**दरवर्षी 18 मे रोजी जगभरातील संग्रहालयांचे महत्त्व शिक्षणाचा स्त्रोत आणि लोकांना त्यांच्या भूतकाळाशी आणि इतिहासाशी जोडणारे साधन म्हणून जागरूकता निर्माण करण्यासाठी 'आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन' साजरा केला जातो. हा दिवस संग्रहालये आणि त्यांच्या कलाकृतींबद्दल लोकांना शिक्षित करण्यासाठी साजरा केला जातो.**

1977 पासून आंतरराष्ट्रीय संग्रहालय परिषद दरवर्षी 18 मे रोजी एक थीम निवडते, ज्यामध्ये पर्यावरणीय काळजी, जागतिकीकरण, संस्कृतीतील अंतर भरून काढणे आणि स्थानिक लोक यांचा समावेश असतो. दरवर्षी अनोख्या थीमसह 'आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन' आयोजित करून आंतरराष्ट्रीय संग्रहालय समुदायाला आदरांजली वाहत आहे, जो एक जागतिक कार्यक्रम आहे. या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनाची थीम 'झपाट्याने बदलणाऱ्या समुदायांमध्ये संग्रहालयांचे भविष्य' अशी आहे. ज्यात संग्रहालये कसा बदलत्या सामाजिक, तांत्रिक आणि पर्यावरणीय वातावरणाशी जुळवून घेतात, याचा विचार केला जाईल. ही थीम संग्रहालयांच्या सांस्कृतिक ओळखीचे आवश्यक कनेक्टर, नवोन्मेषक आणि व्यवस्थापक म्हणून भूमिका अधोरेखित करते. तसेच हा दिवस संग्रहालयांच्या समाजातील महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकतो आणि लोकांना संग्रहालयांमध्ये काय आहे आणि त्यांचे महत्त्व काय आहे, याची जाणीव करून देतो. संग्रहालये ही भूतकाळची खिडकी आहेत, जी भविष्यातील पिढ्यांसाठी इतिहास, संस्कृती आणि सर्जनशीलता जपतात. दरवर्षी संग्रहालये आणि त्यांच्या कलाकृतींबद्दल लोकांना शिक्षित करण्यासाठी 'आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन' साजरा केला जातो. या दिवशी संग्रहालयशास्त्रज्ञ सामान्य लोकांशी भेटून बौद्धिक जीवन समृद्ध करणाऱ्या आणि शिकण्यासाठी आणि कुतूहलासाठी सामुदायिक जागा वाढवणाऱ्या आधुनिक संस्था म्हणून संग्रहालयांच्या भूमिकेवर चर्चा करतात. प्रसिद्ध चित्रांपासून ते सुंदर शिल्पांपर्यंत, जगातील संग्रहालये मानवजातीच्या इतिहासाचे संकलन, जतन, प्रदर्शन आणि अंतर्दृष्टी प्रदान करत आहेत. हा दिन समाजात संग्रहालयांच्या महत्त्वाबद्दल जागतिक जागरूकता वाढविण्यात, सांस्कृतिक देवाणघेवाण, शिक्षण आणि समज आणि शांतता वाढविण्यात त्यांची भूमिका अधोरेखित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. हा कार्यक्रम कलाकृतींच्या बेकायदेशीर तस्करीच्या परिणामाकडे देखील लक्ष वेधतो. आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनानिमित्त अनेक गोष्टी करता येतात. जसे संग्रहालयात जाणे, या दिवशी संग्रहालयांना भेट दिल्याने आपल्या जीवनात त्यांचे महत्त्व समजण्यास मदत होईल. तसेच, प्रदर्शनांद्वारे या प्रदेशाची संस्कृती, वारसा आणि इतिहास जाणून घेता येईल. त्याचप्रमाणे संग्रहालयात स्वयंसेवा केल्याने मौल्यवान अनुभव मिळेल आणि त्याच्या शैक्षणिक ध्येयाला पाठिंबा मिळेल. आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनानिमित्त विशेष कार्यक्रम, प्रदर्शने आणि मार्गदर्शित टूर किंवा व्हर्च्युअल टूर आयोजित केले जातात. जर कुणाला लांब रांगेत उभे राहायचे नसेल, तर ते संग्रहालयाला भेट देऊ शकतात. संग्रहालयांबद्दल जाणून घेण्यासाठी आणि प्रदर्शनांचा आणि परिणामांचा आनंद घेण्यासाठी व्हर्च्युअल टूर हा एक उत्तम मार्ग आणि सर्जनशील कला आहे. या दिवशी आवडत्या शैली किंवा कला चळवळींपैकी एकामध्ये कलाकृती तयार करण्यासाठी स्वतःला आव्हान देऊन आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनानिमित्त आयोजित कार्यशाळा आणि स्पर्धांमध्ये सहभागी व्हायला हवे. या दिनानिमित्त नियोजित कार्यक्रम आणि उपक्रम एक दिवस, एक आठवड्याचा शेवट किंवा संपूर्ण आठवडा टिकू शकतात. आज जागतिक संग्रहालय दिनी सर्वांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! ■ ■



**प्रविण बागडे**
**9923620919**

# संबोधी महाविहारातील भागीदारीवर चर्चा

*14 एप्रिल भीम जयंती ते 12 मे बौद्ध पौर्णिमेला विचारांच्या महोत्सवाचा समारोप झाला. विविध क्षेत्रातील सुप्त गुणांना प्रोत्साहित करण्यासाठी स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. धम्म चळवळीत काम करणाऱ्यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. स्नेह भोजन आणि संबोधी महाविहारात चर्चा सुरू झाली. कल्याण मित्र डी. आर. कांबळे, बी आर एस पी चे राष्ट्रीय अध्यक्ष उपाध्यक्ष रमेश पाटील, संबोधी महाविहाराचे अध्यक्ष दिनेश पाटील आणि दैनिक बहुजन सौरभचे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण भागीदारी या विषयावरती चर्चा केली.*

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना मानणाऱ्या लोकांनी भागीदारी वाढविणे गरजेचे आहे. भागीदारी विविध क्षेत्रात वाढविली नाही तर आपण कुठेतरी कमी पडू आणि येणाऱ्या पिढीला त्याचे परिणाम भोगावे लागतील. जे काही समजदार, अभ्यासक, चिंतक, विचारवंत, कार्यकर्ता आहेत या लोकांनी आपापल्या क्षेत्रामध्ये भागीदारी वाढविणे ही काळाची गरज आहे. केवळ हातावर हा ठेवून किंवा वायफळ चर्चा करून भागीदारी वाढणार नाही तर भागीदारी वाढविण्यासाठी स्वतः हा प्रत्यक्ष त्यात भाग घेतला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत अशा कठीण काळामध्ये आपली चळवळ पुढे नेलेली आहे. त्या काळामध्ये त्यांच्याकडे साधनसंपत्ती नव्हती तरी ही लोकांच्या जोरावर त्यांनी लोक जनजागृती करून माणुसकीची चळवळ उभी केली होती. डॉ. बाबासाहेबांची चळवळ ही इतर चळवळीपेक्षा फार मोठी श्रीमंत चळवळ झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महाडचा सत्याग्रह, पुणे करार, काळाराम मंदिराचा सत्याग्रह, 14 ऑक्टोबर धम्मक्रांती, भारतीय संविधानात संविधान लिहिण्याचे कार्य असेल तर ठिकठिकाणची जाहीर सभा, परिषद असो त्याठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाऊन अल्पकाळामध्ये म्हणजे 45 वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जे काही कार्य करण्यास मिळाले ते कार्य करण्यामध्ये त्यांनी किती दिवस, काळ आणि वेळ दिला आहे. आपला मजबूत समाज निर्माण करण्याच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रयत्न केला. तो यशस्वी झाला आहे. डॉ. बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वानुसार आम्हाला सर्व काही प्राप्त झाले आहे. ते म्हणाले की, आपल्या कमाईचा पाचवा हिस्सा आपल्या समाजाच्या उद्धारासाठी आपण खर्च केला पाहिजे. अनेकांनी आपल्या कमाईचा पाचवा हिस्सा समाजासाठी खर्च केला आहे. इतरांनी तो करावा आणि नियमित या कार्यामध्ये आपली भागीदारी वाढविणे ही काळाची गरज आहे. याकरिता प्रत्येकाने आपल्या परीने काम कार्य केले तर आपली भागीदारी मोठी होऊ शकते. आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची आणि विहारांची गरज नाही. जे काही आपल्या पूर्वजांनी करून ठेवले ते आपल्यासाठी पुरे आहे. रविवारला विहार गेले पाहिजे. धम्मदेशना, पौर्णिमा, महापुरुषांचे दिवस, मुलांचे वाढदिवस, जेष्ठ नागरिकांचे वाढदिवस, लग्न कमी लोकांत विहारातून झाले पाहिजे. यामुळे विहारात हालचाली होतील. मोठ्या प्रमाणात दान गोळा होईल. त्यातून काही विधायक कार्य करता येईल अशी भागीदारी वाढविणे गरजेचे आहे. येणाऱ्या पिढीसाठी आपली भागीदारी पाहिजे. आपण राजकीय पटलावरुन बाद होऊ नये. राजकारण हे फार प्रगतीचे साधन आहे. लोकशाहीतून आपली प्रगती होऊ शकते हे आपण सर्वांनी पाहिलेले आहे. त्याचबरोबर प्रशासकीय यंत्रणेवरसुद्धा आपला दबाव असला पाहिजे. त्याकरिता प्रशासकीय यंत्रणेत सुद्धा आपण सहभागी झालो पाहिजे. ही आपली खरी भागीदारी आहे. आपली जी काही भागीदारी आहे ती समाज जोडण्याची भागीदारी आहे. इतर समाजाला सुद्धा आपण आपल्यामध्ये जोडून घेतले पाहिजे. एक काळ असा होता की रिपब्लिकन पक्ष आणि बहुजन समाज पक्षात अनेक जाती धर्माचे लोक सहभागी होते. त्यांना सेकंड लीडरशिपही देण्यात आली होती. परंतु मधल्या काळामध्ये जी काही आपल्यावरती निराशा आली ती आपल्याला अधोगतीकडून घेऊन गेलेली आहे. सध्याच्या परिवर्तनाच्या काळामध्ये आपण पन्नास वर्ष मागे गेलो आहोत. पन्नास वर्षाचा जर हिशोब केला तर जे कमावले आणि गमावले आहे ते चिंतनीय आहे. जे काही आपले सेवानिवृत्त लोक आहेत या सेवानिवृत्त लोकांची ही जबाबदारी फार मोठी आहे. त्यांनी भागीदारी वाढविणे ही काळाची गरज आहे. मग ते बुद्धविहाराच्या माध्यमातून, धम्माच्या माध्यमातून, आर्थिक माध्यमातून, सहकार क्षेत्राच्या माध्यमातून, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य या सर्व माध्यमातून आपली भागीदारी वाढविणे गरजेचे आहे. याकरिता आपण मुळातच थांबता कामा नये. ज्या वेगाने आपण ही सर्व चित्र काबीज केलेली आहे या सर्व क्षेत्रावर जी आपली छाप पडलेली आहे. ती आपली ओळख आहे. आंबेडकर चळवळीने स्वतःची बुद्ध, भीम गीते तयार केली. आंबेडकरी जलसा, शाहिरी, कव्वाली, नाट्य या सांस्कृतिक क्षेत्रातूनही जनप्रबोधन करण्याचे कार्य केले यातही कलावंतांची भागीदारी मोठीच राहिलेली आहे. आंबेडकरवादी लोकांनी साहित्याची नवनिर्मिती करून साहित्याचे सौंदर्य वाढविले आहे. याचे सारे श्रेय हे आपल्या लेखकांना जाते. काही आर्थिक क्षेत्राच्या अभ्यासकांनी भागीदारीतून बँक, पतसंस्था निर्माण केल्या आहेत यात नव्याने भागीदारी वाढली पाहिजे. पुन्हा जोशाने नव्या पिढीने विविध उद्योगधंद्यामध्ये सहभागी झालो पाहिजे. काही तरुणांनी डिक्की ही औद्योगिक क्षेत्रातली एक औद्योगिक संस्था स्थापन करून पूर्ण भारतभर आपले नाव कमविले आहे. भागीदारी जर आपण कायम ठेवली तर आपल्याला कार्यात आडकाठी कोणी आणू शकणार नाही. आपल्यात संपर्क, संवाद, सहवास असला पाहिजे. तथागत बुद्ध म्हणतात, 'जे लोक संख्येने कमी परंतु वारंवार एकही एकत्र येतात विचार विनिमय करतात ते लोक कधी पण पुढे प्रगत प्रगतीचे पुढचे पाऊल टाकत असतात.' तथागत गौतम बुद्ध यांच्या शिकवणीनुसार आपल्या भागीदारीकडे लक्ष देणे काळाची गरज आहे. जर आपण भागीदारीकडे लक्ष दिले नाही, तर आपण मागे पडू, अनेकांनी सहकार क्षेत्रातून फार मोठे चांगले कार्य करण्यास प्रारंभ केलेले आहे. आपण आपल्या समाजाच्या उद्धारासाठी प्रत्येक क्षेत्राचे भागीदार होऊ या. माझे समाजात काहीतरी योगदान आहे. हे समाधान आपल्या कुटुंबीयांना, आपल्या मुलांना, नातवांना होईल म्हणून भागीदारीकडे लक्ष देणे ही काळाची गरज आहे. ■ ■


विलास गजभिये
मो. 9421588901



संबोधी महाविहार,धाडीवाल-ले-आऊट,नागपूर


## काव्यफुले
संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

### स्वप्न गुराख्याचे

बाळुला सापडली धनाची पेटी
म्हणाला मी राजा नको ही काठी
काय ते सिंहासन बाजुला दासी
मी किती भाग्यवान व माझी राशी

हुकुम देताच शिपाई येती पुढे
जी हुजूर जी हुजूर करती मागेपुढे
बाळू आकाशात उंच उडू लागला
दरबारात सुंदर परी दिसू लागल्या

पंच पक्वान्न असती ताटात
दासी देई पाण्याचा प्याला हातात
ढेकर देऊन बाळु जाई झोपी
सुंदर राजमहाल किती छान टोपी

पहावेसे वाटे जेव्हा जेव्हा गुणवंत
सादर दरबारात अनेक कलावंत
नृत्य मनोरंजन दरबारात चालायचे
बाळु सोबत सैनिक, मंत्री पाहायचे

जोरानी ओरडला बाळु वा वा वाह
आईनेओढली चादर म्हणे सूर्य पह
दिली फडक्यात भाजी आणि
भाकरी
म्हणे ये जा लवकर करीन हं पुरी

म्हणून म्हणतो स्वप्न स्वप्नच असता
ती कधीच खरी होत नसतात
गुपचूप बाळू डोळे चोळत उठी
निघाला घेऊन म्हशी आणि काठी

- कुसुमलता दिलीप वाकडे

### ठिणगी

एक ठिणगी इवलीसी,
घेते अनेक रूप
परिणाम तिचे बदलती,
आपले स्वरूप
करी अग्नितांडव,
करी उद्ध्वस्त संसार
क्रांती ज्योत पेटवि मनात,
कधी पेटूनिया अंधार
एक ठिणगी नकळत
वनव्याचे रूप घेते
रानास असो की मनास
ती जाळत असते
एक ठिणगी सोडते तीर कटू शब्दांचे
काळीज चिरून करते, घाव जखमांचे
शब्दांचा वापर करावा, सुमना प्रमाणे
अस्तित्व कोमेजून ही देतो
सुगंध नियमाने
एक ठिणगी होते,
साक्षी सात फेऱ्यांना
अग्नी कुंडाच्या पवित्र्यात,
जुळावी दोन जीवांना
आविश्वासाला नसावी जागा
अशा पवित्र सोहळ्यात
बहरण्या आधीच संसारवेल
गुरफटते शंकेच्या जाळ्यात
आपल्याच हाती आहे
स्वरूप तिचे बदलणे
प्रेमाची फुंकर घालून विझवणे
की आगीत तेल ओतून फुलवणे
पाडायचीच आहे ठिणगी तर
पाडा जीव्हाळ्याची, मदतीची.
करुणेची, क्षमाशीलतेची
पण, पडू नका देऊ
ठिणगी विषमतेची

- सुरेखा ताकसांडे

### बिल्लोरी आरसा

भेटल्यानंतर तिला सांगावे
असं खूप वेळा वाटते...
पण जेव्हा येते समोर ती
सारे आतल्या आत आटते...
काय बोलावे; काय नाही
सोबत नसल्यावर कळते...
मन मात्र तिच्या शब्दांसाठी
क्षणा-क्षणाला झुरते...
तिचे हसणे; तिचे रूसणे
सारंच हवेहवेसे वाटते...
मोनालिसाच्या चित्राचे गूढ
तिच्या कृतीतून भासते...
कितीतरी वेळा ती अशी
माझ्या लेखणीतून साकारते...
तिला मूर्त स्वरूप देतांना
ती साक्षात उभी ठाकते...
नाही हा भास फक्त मनाचा
नाही कल्पनेचा हा वसा...
प्रेमरूपी माझ्या जगाचा
आहे ती बिल्लोरी आरसा...
मी माझ्या या प्रवासात
बांधलाय शब्दांचा सेतू...
तिच्या सोबत चालताना
नाही मनात किंतु नि परंतु...

- सुभाष उमरकर

### भोंदुत्त्ववादी धिंगाणा

भोंदुत्त्ववादी कावळ्यांनी, आसमंत विद्रूप केले
भयावह सावटांनी दिगंत हे भेसूर झाले

प्राचीन थडग्यातुनी अबतरे सैतान सेना
अभद्र त्यांचा हो हल्ला, पाहवेना देशदैना

गर्वांध पलटन भगव्यांची बेबंद मुजोर आहे
सनातनी छावणीची लालसा शिरजोर आहे

बेताल रेड्यांचा धिंगाणा साग्रसंगीत चालतो
धर्मांधांचा अधर्म कैसी गर्वभाषा बोलतो

भन्नाट या कसायांची कामना सैराट झाली
वाटते लांडग्यांची जागजागी माय व्याली

- पुरुषोत्तम भिसीकर

### उठाव

उठावाच्या दिशेने
तिने केलेली चाल..
महात्मा जोतीरावाच्या
युध्द छावनीतील
अंगार घेऊन
शत्रूला बेचिराख
करत निघाली आहे..
आणि
तुम्ही धर्म शोधताय..
थू
तुमच्या जगण्यावर...!!

- संदीप गायकवाड

### हसरा रविवार

सासू सुनेची पत्रिका
जुळता शांती आपोआप
अन्यथा कुणाची हिंमत
बोलायाची समोर ना टाप
ऐतिहासिक नाते अन
वारसा जुना अपरंपार
सकाळ ते संध्याकाळ
शब्दांचेच चालतात वार
कुणाची बाजू घ्यावी
तो संभ्रमात बिचारा
खोटे लिहिणार नाही
मनाला आपल्या विचारा
दोन्हीकडून थपडा
दोन्ही बाजुंनी ढोल
जसा पाहिजे तसा
निघे त्याच्यातून बोल
कधी तह कधी युती
तो करतो मध्यस्थी
दोन्ही मध्ये दबलेला
काय सांगायची स्थिती

उजेडवातीकार - गुलाब मोहिते

## व्यवस्थेला चिरफाड करणारी कविता

# ‘काहूर वेदनेचे’

‘काहूर वेदनेचे’ या काव्यसंग्रहाला नामवंत कवी व समीक्षक डायरीकार प्रा. युवराज गंगाराम यांनी अत्यंत महत्वपूर्ण प्रस्तावना लिहिली आहे. ‘प्रस्तावनाच कवितासंग्रहाची आत्मा असण्याचे मौलिक कार्य करत असते असे म्हणायला काही हरकत नाही.’ कालिदास सूर्यवंशी यांनी हे कविता संग्रह महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समर्पित केले आहे. कोरोना काळातील कविता असल्याचे त्यांनी उल्लेख केले आहे. त्याबरोबर अनेक महापुरुषांच्या विचारांनी प्रेरित होऊन कवी कालिदास सूर्यवंशी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्रात त्यांचा मोठा वाटा दिसून येत आहे.

*‘अंतर्मनातील काहूर’ हे नाव आवडले आणि माझ्या पाठीवर सहानुभूतीचा हात आशीर्वादाने मांडला. त्यांनी मला आंबेडकरवादी साहित्याचे ग्रंथ (पुस्तके) माझ्या प्रबंध लिखणाच्या कामास मदत होईल म्हणून दिले, त्यामुळे आणखीनच या नात्यात भर पडली. असेच लोक मला प्रेम देत आपलासा करतात. आणखी काय हवे जीवनात.*

संग्रहात त्यांनी अनेक समाजामध्ये होणारे अन्याय, अत्याचार, जुलूम या लोकशाहीच्या देशात होत आहेत. यावर जालीम उपाय किंवा लोकजागृती करणारे, बंड करून उठणारे काम या कवितेच्या रूपाने केल्याचे नोंद झालेच आहे. कविता वाचून मला थांबता आलेच नाही म्हणून...

सांग स्वातंत्र्या येथे का हे मरण स्वस्त
आहे?
माणुसकी मुसली आतंकवाद पेटले आहे,
धर्माच्या नावावर हिंसाचार माजले आहे
कुठे आंदोलन, मोर्चे, गोळीबार सुरु आहे.

कवी आवाहन कवितेमध्ये मोठ्या आक्रांताने देशाबद्दल अनेक बाबी बोलताना त्यांच्या मनात एक प्रचंड राग आला आहे. देशात आंदोलन, मोर्चे, गोळीबार आणि माणसाला माणूस न समजणारा आतंकवाद धर्माच्या नावावर पेटला आहे. यामध्ये जीव कसा रमणार आहे. अनेक निष्पाप जीवांचे जीव जाताना कवी डोळ्याने पाहतो आहे. म्हणून कवीच्या मनातील हे ‘पेटलेले काहूर’ आहे.

‘जगातील विद्वनात आमच्या बापाचा नाव आहे हे
आमच्यासाठी मोठी गर्वाची गोष्ट आहे.’

त्यामुळे कवी बालकामगार कवितेमध्ये समाजातील घटकांना, युवकांना संदेश देतात. तुझी वय नाही काम करण्याची, जरी गरिबी असली तरी, आपण शिकलो पाहिजे तरच जीवनाचे कल्याण होईल.

‘कबीरा तुझ्या विद्यापीठातील
तत्वज्ञानासमोर
ब्राम्हण, पंडीत, मुल्ला, काजी
सर्व कवडीमोल ठरले आहेत,
कबीर तू महाकवी आहेस.’

कवीने कबीरा कवितेत जबरजस्त दाखला कबीरांचा देऊन एक नवा क्षितीज उमटवला आहे. कवीचे गुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुरु बुद्ध, कबीर, फुले हे गुरु. गुरूच्या गुरूला केलेला हा प्रश्न आहे. कबीराला काजीने प्रश्न केला तुझी जात कोणती ते कबीर उत्तरले आणि मदरशाचा दरवाजा कायमचा बंद झाला. तेव्हा कबीर कोणत्याच शाळेत गेला नाही. स्वतःच्या ज्ञानावर कबीराने जगात मोठे नाव कमावले आहे. त्यामुळे ब्राम्हण, पंडीत, मुल्ला, काजी हे त्यांच्याच गंगेत वाहून गेले. आज कबीरचे एक विद्यापीठ झाले, एक महाकवी झाले. कबीराची क्रांती कवीला आणि कवीच्या जीवनाला कलाटणी दिली, असे म्हणणे योग्य ठरू शकते.

‘बाबा’ तू सूर्य आम्हासाठी...!
‘महार’ जातीच्या बाहेर, कुपाच्या बाहेर मग गावाच्या बाहेर.
अशी आमची जिंदगी होती. बाबा, आम्ही कुत्र्यासारखे जगत होतो. आम्हाला उत्तम वागणूक नव्हती. पण तुझ्या कार्याने आम्ही आज खूप महत्वाचे जीवन जगात आहेत. तू आमच्यासाठी सूर्य झालास आणि आमच्या जगण्याला नवी उर्जा दिली. तू केलेस समाजाचे परिवर्तन म्हणून आम्हाला समाजात मोठे स्थान मिळाले आहे. बाबा, तूच आमचे जीवन आहे. तुझ्यामुळे आज आम्ही साहेब झालो, सुटाबुटात आलो.
अरे सारा जग बुद्ध धम्माकडे वळतो आहे
तू मात्र धम्मद्रोही बनून
भलत्याच मार्गाने पळतो आहे...

कवी कालिदास सूर्यवंशी यांनी अत्यंत मार्मिक वेदना मांडली आहे. अनेक बाबींचे काहूर कवीच्या मनात होते. वेदना सहन होत नाही. बुद्धापासून तर डॉ. बाबासाहेब यांच्यापर्यंत ‘धम्म’ वाढविणे आणि प्रसार करणे हे सर्वांचे काम आहे. जग हे बुद्धमय करायचे स्वप्न आपण उपासकांनी केला पाहिजे. त्याबरोबर भिक्खूसंघ यांनी पण केला पाहिजे. जग बुद्ध यांच्याकडे जात आहे. पण आपला माणूस हा भलत्या मार्गाला जातो आहे. जगातील ‘विज्ञानवादी, सम्यक मार्ग, चार आर्यसत्य, आठ अष्टांगिक मार्ग, दहा पारमिता, बावीस प्रतिज्ञा’ आदी आम्हाला माणूस जगण्यासाठी दिल्या आहेत. पण आंबेडकरी समाजाचा माणूस या सर्व गोष्टी सोडून तो थोतांडी, कर्मकांडी, रूढी, परंपरा यांच्या हिंदुत्वादी मार्गाला जोपासतो आहे. हे कलंकित आहे. असा खरा बौद्ध होऊ शकत नाही. असे अनेक उदाहरण आहेत जे मनात काहूर माजवून टाकतात. अशा वेदना किती लपवणार आहेत. कवी कालीदास सूर्यवंशी यांनी आपल्या वैचारिक बळाने कवितेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश देण्याचे उत्तम प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न त्यांचा सफल होईल अशी आशा बाळगतो. कवीने ‘बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर’ विचारधारा मांडण्याचा योग्य निर्णयक पायंडा होता. तो स्पष्ट दिसून येते. आंबेडकरांची निष्ठा असलेला माणूस हा काही अंशी तरी परिवर्तन करून प्रबोधन करण्याचा प्रयत्न करत असतो. असेच माणसे कवी कालिदास सूर्यवंशी यांनी केला आहे. सर्व कविता सुंदर आहेत. समाजाला याचे मार्गदर्शन होणार ही माझी खात्री आहे. वाचकांना आवडतील अशीही मनी इच्छा ठेवतो. या निमित्ताने कवीला खूप खूप शुभेच्छा. जयभीम ! ■ ■

कवितासंग्रह : काहूर वेदनेचे
प्रकाशन - रचना प्रकाशन आरमोरी
कवी : कलीदास सूर्यवंशी





मुन्नाभाई नंदागवळी,
मो. 9764676499

# बहारदार कार्यक्रम करणारा दमदार गायक

**कलावंत जन्मावा लागतो तसा तो घडवावा लागतो. काही कला एका पिढीकडून पुढच्या पिढीत वारसा हक्काने नकळत येतात. तर काही कला, कलाकार कोणताही वारसा नसतांना आपल्या आवडीने निरीक्षण शक्तीने अभ्यासाने दुसऱ्यांच्या प्रोत्साहन सहकाऱ्याने प्राप्त करून त्यात यशस्वी होतात. नाव लौकिक करतात. अशाच कलावंतांपैकी एक दमदार पहाडी आवाजाचा गायक संजय शांताराम गमरे, गाव पोसरे, ता. चिपळूण जि. रत्नागिरी.**

संजय शांताराम गमरे यांची आई मिनाबाई पूर्वाश्रमीची भिमा आनंदा मोहिते माहेर पोसरे दोन भाऊ त्यातील रामचंद्र आनंदा मोहिते हे प्रख्यात त्याकाळातील सायकल स्वार ज्यांनी संपूर्ण देशात सायकलीवर अनेक प्रयोग केले. सलग एका गोल रिंगणात तीन पाच दिवस सायकल चालविणे, भूमीत स्वतःला दफन करुन घेणे, छातीवर दगड फोडने, बल्ब काचा खाणे असे अनेक प्रयोग त्यांनी केले. भारताच्या तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी त्यांचा प्रयोग पाहून कौतुक केले होते सत्कार केला होता. त्यांच्या संग्रहातील देशातील विविध मान्यवर यांच्यासोबतच त्यांचे फोटो मी स्वतः पाहिले आहेत. मी पदवीधर झालो शिक्षक झालो दादा माझा खूप आदर करायचे. तर हे रामचंद्रदादा संजयचे मामा. यांनाही गाण्याची कलेची आवड होती. तोच वारसा नकळत संजयकडे आलेला आहे.

मुंबईत शिवडीत राहून कामातून आल्यावर विरंगुळा म्हणून संजय रिकामा डबा, कधी ताट वाजवून इतर कवींची, कॅसेटमधील गीत आपल्या मित्रांसह खोलीत, कधी मैदानात म्हणत असे. सामजिक कार्यकर्ते भगवानदादा साळवीनी जिमखाना मध्ये नोकरीत लावला. खेळातही संजयला आवड आहे. साळवी दादांनी मुंबईत शीवडीत प्रख्यात गायिका मिनाक्षीताई थोरात सोबत गायनाचा प्रथम कार्यक्रम दिला. तो कार्यक्रम यशस्वी झाल. आज महाराष्ट्रातील नामवंत गायक गायिका सोबत संजयचे गायनाचे मुकाबले होत असतात. त्याला कवी मुकुंद महाडिक यांचे प्रोत्साहन सहकार्य मिळाले आहे त्यांचीच गीते तो गातो. आज प्रख्यात कवी शशिकांत कापसे दादा सारखे कवी त्याला गीत देतात. आज संजय स्वतःही उत्तम गीते लिहितो. एखादा विषय सुचला की मलाही फोनवर मामानो काय चुकलय का बघा विचारतो. त्याच्या गीतात चूक दाखविण्यासारखे शकतो काही नसते. मी ही कधीतरी एखादे गीत देतो. त्यांच्या कार्यक्रमात आजूबाजूला असतो.

त्याचे रमाई गीत माझ्यासह अनेकांना आवडत.

‘धनी शिकूनी साहेब होण्या
शेणी वाहिल्या डोई
अजोड केली कमाई
अडाणी माता माझी रमाई’

रसिक या गीताला दाद देतात तो त्याचे ताकदीने गीते गातो. उच्चार स्पष्ट असतात. ताल स्वराची उत्तम जाणे आहे. आपला विषय तो तेवढयाच ताकदीने समोरील पार्टी रसिकांना समजावून सांगतो. स्टेजवर तो मुक्तपणे बिनधास्त गातो. सवालाला जबाब लिहितो गातो. इतरांना कार्यक्रमाला मदत करतो.

कवी मुकुंद महाडीक यांचे गीत संजय छान गातो ‘वर्तुळ रुपी समाज झाला चौकोन या पूर्वेला दोन आणि दक्षिणेस दोन वाली या समाजाला कोण? सांगा वाली कोण’.

कवी मुकुंद महाडीक यांच्या गीतांसह, विजय पवार माझ्यासारख्यानी दिलेले एखाद गीतही तो त्याला विषय चांगला वाटणाऱ्या कवींची गीते गात असतो. तसा तो अभ्यासू नी चोखंदळ गायक आहे.

मे महिन्यात किंवा सुट्टीत मुंबईत पोसऱ्यात गेलो की प्रविण, संजय यांची नवीन नविन गाणी ऐकण्यात मला आनंद मिळतो. यांच्या सोबत राजेश सुभाष मोहिते असणार मामा असा विषय या चालीवर लिहा हा दोघांचा आग्रह असतो. बघतो रे जमल तर लिहीन. आमची मैफिल छान रंगते. कधीतरी संजयला आपण शिकलो नाही याची खंत वाटते पण मामा मी मुलांना शिकविणार सांगतो. कलाकार हा कलाकार असतो त्याठिकाणी शिक्षण कुणी पहात नाही. पण कलाकाराने आपल्या कलेत नवनवीन शिकावे असे मला वाटते आणि संजय तो प्रयत्न नक्की करतो हे त्याचा कार्यक्रम पाहून ऐकून मला जाणवते. आपल्या सहकलाकार यांनाही तो नेहमीच खुश ठेवतो जे मिळेल ते त्यांनाही खुशीने देतो. सारेच खुश, आपल्याला नोकरी आहे म्हणतो छंद आणि सामाजिक कला, सांस्कृतिक चळवळ जपण्याचे संजय गमरे यांच्या धडपडीच कौतुक वाटत. त्याने गात, शिकत रहावे, आपल नावलौकिक वाढवाव आज समाजाला मनोरंनाबरोबरच प्रबोधनाची गरज आहे अनेक कलावंत हे कार्य करत आहेत संजय सुद्धा याच मार्गाने चालत आहे. त्यांनी पुढे चालत राहावे नोकरी, कुटुंब सांभाळून हा वसा तो जपतो आहे. त्याच्या कलागुणांना संजीवनी देणारी सहचारिणी संजीवनीची त्याला भक्कम साथ आहे. गायक संजय गमरे यांच्या पुढील कला सामाजिक प्रबोधन कार्यासाठी मनःपूर्वक हार्दिक मंगल कामना शूभेच्छा! ■ ■



संजय शांताराम गमरे


राष्ट्रपाल भा. सावंत
मो. 9403144356

# सासूच्या अज्ञानाची आणि सुनेच्या विज्ञानाची गोष्ट

शिक्षण ही वाघिणीचे दूध आहे असे म्हटल्या जाते. आज कालचे मुलमुली उच्च शिक्षण घेऊन पदवीधर झाले आहेत. तर काही आधुनिक तंत्रज्ञानात मास्टर डिग्री घेऊन परदेशात उच्च पदावर नोकरी करत आहेत. पण लग्न मात्र आईवडीलच्या मर्जीनुसार खूप मुली पहिल्या नंतर किंवा मुले पहिल्या नंतर करतात. एप्रिल मे हा लग्नाचा मौसम असतो. त्यानिमित्याने मला मुंबईते नागपूर चंद्रपूर पर्यंत विविध अधिकारी मित्रांच्या नातलगांच्या मुलामुलीच्या लग्न सोहळ्यात सहभागी होण्याचा मान सन्मान मिळाला. त्यात मला जे दिसते ते मी दरवर्षी नोंद करून ठेवतो. उच्च शिक्षित मुलाची आई म्हणजे सासू आणि उच्च शिक्षित विज्ञानवादी सून कुटुंबात कसे स्वताचे स्थान निर्माण करते हे बुद्ध आणि त्यांचा धम्म यातील विशाखा बाबत वाचले असेलचे.

मुलाच नवीन नवीन लग्न होत. नवी सून घरात आली. दोन तीन दिवस गेल्यावर सासू सुनेला विचारते तू सगळ्यात जास्त कुणाला मानतेस? सूनेन उत्तर दिल आईला. एक जिने मला जन्म दिला. दुसरी तुम्ही. सासू असलात तरी मला आई समानच आहात. हे उत्तर ऐकून सासू खूप खूष होते. आपल्याला खूप चांगली आणि हुशार सून मिळाली असे तिला वाटते. पुढे सासू सुनेला बोलते हे बघ तुला किनई आणखी एका आईला मानाव लागेल. आपल्या कुळ देवीला. आपण उद्या जायच दर्शनाला. दोघी दुसऱ्या दिवशी जातात देवळात. जाताना एका गाईच वासरु गाईच दूध पितांना दिसत. सून सासूला बोलते आई थोड थांबा, मी बालदी आणून दूध काढते. सासू कप्पाळवर हात मारते आणि म्हणते अरे देवा मी जिला हुशार समजत होते ती माझी सून मूर्ख आहे, ठार वेडी आहे. मी फसले. सासू सूनेवर ओरडते, अग इतकेही कळत नाही तुला की ही गाय आणि वासरु दगडाची आहे. त्या दोघी पुढे जातात, सासू पुढ, सून मागे मागे चाललेल्या असतात. पुढे काही आंतरावर गेल्यावर सून अचानक सासूला मागे ओढते. आई पुढे नका जाऊ, तो सिंह तुम्हाला खाईल. सासून पुन्हा कप्पाळला हात लावला. अग तो दगडाचा सिंह मला कसा खाईल. सासू वैतागत सूनेला देवळात नेते आणि म्हणते ही आपली कुळ देवी. हात जोड आणि माग हवे ते. सून सासूला विचारते माझ्यासाठीच मागू कि तुमच्या साठी पण ? सासू बोलते तुझ्या मनाला वाटेल ते मनापासून माग. सून विचारते दागिने मागू ? सासू बोलते नको. तसल काही मागायच नसत. मग पैसे मागू ? सासू बोलते नको, तसल काही मागायच नसत. मग कपडे ? नको ग तसल काही मागायच नसते. आई मग मला कि नई खूप भूक लागली आहे, चांगली पंचपक्वानांनी भरलेली दोन ताट मागू ? सासू चिडते आणि म्हणते तस काही मागायच नसत गं. बघ मी तुला सांगते ते माग. सासू सुनेला सांगते आणि सून देवीजवळ ते मागते. आणि मांडी घालून खाली बसते. सासूला वाटते सून देवीला बसून प्रार्थना करते, सासू थोडावेळ उभी राहून वाट बघते सून आता उठेल, आता उठेल. पण सून बसूनच राहते. सासू विचारते, काय गं का बसलीस अशी इतका वेळ..? तर सून म्हणते, तुम्हाला नातवाच तोंड बघायचय ना? देवीजवळ मागितलय ना आत्ता आपण. मी वाट बघतेय देवी कधी देतेय याची.

आता सासू भांबावून गेली आणि सूनेवर खेकसली. तू इतकी मूर्ख असशील असे वाटल नव्हते, माझ्या लेकाच नशीब फुटक. आसली येडी त्याच्या पदरात पडली. कसे होईल माझ्या लेकाच..? सासू रडवेली झाली. त्यात सून विचारते आई माझ काही चुकल का..? सासू आणखी चवताळते आणि बोलते, नाही माझच चुकले, काय गं काल तर एकदम शहाण्या सारख उत्तर दिलस आणि आज अशी मूर्खासारखी का वागतेस..? दगडाची गाय वासरु पाहून दूध काढायला जातेस, अग दगडाची गाय कधी दूध देते काय..?. दगडी सिंह पाहून घाबरलीस, दगडाचा सिंह माणसाला काही करु शकतो का..? सांग. इतकही कस कळत नाही तुला..? सून बोलते आई दगडाची गाय दूध देत नाही, दगडाचा सिंह माणसाला काहीच करु शकत नाही. मग दगडाची देवी कसे काय आपण मागितलेल देईल..? आजोबा पणजोबापासून रीतीरिवाज परंपरा ने आजवर हे दगडच आपल्याला सगळ काही देतात अस आपण मानत आलो. पण आई आपण कष्ट करतो तेंव्हाच धन संप्पत्ती मिळते. अन्न मिळत. हवा सर्वत्र भरलेली आहे पण ती आपण नाकाने आत ओढण्याच कष्ट करतो म्हणून जगतो, ती हवाही आपोआप फुफ्फुसात जात नाही. या दगडांना पायाखाली धरुन आकार दिला माणसान. ज्याला माणूस घडवतो तो माणसाला काय देऊ शकतो. गाडगेबाबा म्हणतात देवळात देव नसतो. देवळात असते पुजाऱ्याचे पोट. गणपतीच वाहन उंदीर आपण दगडी उंदराला पुजतो, पण घरातल्या उंदरांना विष घालून मारतो. नाग शंकराच्या गळ्यात असतो म्हणून आपण मातीचा नाग पूजतो. पण खरा नाग दिसला तर मारुन टाकतो. खंडोबा म्हणजे कुत्रा, दत्ताचा आवडता कुत्रा, दिसला की हाड हाड, दगडांचा मार. आजून किती काळ हे निरुपयोगी माती धोंड्याचे देव पुजायचे..? कुठला असा देव आहे तो आज भुकेलेल्याला जेवण आणि तहानलेल्याला पाणी देईल. शेतकरी पाणी नाही म्हणून आत्महत्या करतात. का तिथ पाऊस पडत नाही. देवळात बलात्कार होतात, बॉम्बस्फोट होतात, चोऱ्या होतात, चांदीचे, सोन्याचे देवाचे डोळे चोर काढून नेतात. म्हणून गाडगेबाबा म्हणतात आरे, जो त्याच्या पुढ्‌तल्या जेवणावर बसणारा कावळा पिटाळू शकत नाही तो तुमच्या जीवनातल दुः खा दैन्य काय दूर करणार..? ब्राम्हणांनी स्वतःचे पोट जाळण्यासाठी अनेक थोतांडे तुमच्या डोक्यात भरली..! तुम्हाला मानसिक गुलाम केले..! यातले उघड सत्य स्वीकारायला माणूस तयार नाही आणि शिडीला तिरूपतीला पायी जातो. पंढरपूरला पायी चालतो, परंतू चोख्याला विठ्ठलाच्या पायरी खाली कां पुरले याचा विचार करत नाही, तुकाराम महाराजांचे तुकडे करून पाण्यात बुडवून मारले हे विसरून जातो..! बुद्धीची देवता गणपतीची दिड दिवसापासून दहा दिवस मनोभावो पूजा अर्चा उपास, नवस करून हजारो रुपये खर्च करून विज्ञानाच्या तत्वज्ञाने बनविलेली यंत्रणा वापरतात. तेव्हा माणूस मेंदूची, पैशाची आणि वेळेची बरबादी करतो..!! अज्ञान अंधश्रद्धा सर्व श्रेष्ठ ठरविल्या जाते. विज्ञानाला हार मानवी लागते. स्मार्ट मोबाईल, गुगल नेटवर्क वायफाय वापरून ही विज्ञान कळत नसेल तर ? कधी कळेल विज्ञान..? कधी जळेल अज्ञान..? आजच्या सासूला असे विचारणारी सुशिक्षित सून मिळाली पाहिजे. माफ करा वाचकांनो त्यात सून विचारते आई माझ काही चुकल का..? हे बरोबर आहे ना ? ■ ■





सागर रामभाऊ तायडे
9920403859

# कावळापेठ अंडरब्रिजचा प्रश्न याच महिन्यात सुटणार!

## रेल्वे प्रबंधकाचे बसपाच्या शिष्टमंडळाला आश्वासन

**नागपूर :** मागील दोन वर्षापासून कावळा पेठ शांतीनगर रेल्वे क्रॉसिंग खालील अंडरब्रिजचे काम सुरू न झाल्याने या परिसरातील विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांना ओव्हरब्रिजने 3 किलोमीटरचा प्रवास करावा लागतो, त्यामुळे अंडरब्रिजच्या कामाला रेल्वेने विना विलंब परवानगी द्यावी, अशी मागणी बसपाच्या शिष्टमंडळाने दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे प्रबंधक दीपक कुमार गुप्ता यांची भेट घेऊन केली.

याच मे महिन्यात जर रेल्वेने अंडरब्रिजला परवानगी देऊन कामाची सुरुवात केली नाही तर बसपा स्थानिक नागरिकांच्या माध्यमातून रेल रोको आंदोलन करेल असा इशारा दिला. त्यामुळे रेल्वे प्रशासन यावर लगेच निर्णय घेईल असे आश्वासन डी आर एम यांनी शिष्टमंडळाला दिले. कावळपेठ-शांतीनगर येथील अंडर ब्रिज (पुशबॉक्स) बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक 1 च्या माध्यमातून 2024 पासून रेल्वेच्या परवानगीसाठी सतत पत्रव्यवहार सुरू आहे. नागरिक व विद्यार्थी आपला जीव धोक्यात घालून रेल्वे लाईन अनधिकृतपणे ओलांडत आहेत. आतापर्यंत बांधकाम विभागाने 26 जानेवारी, 18 मार्च, 22 एप्रिल, 27 एप्रिल, 14 नोव्हेंबर 2024 तसेच 22 एप्रिल 2025 या तारखेला पत्रे



पाठविलेली आहेत. आमदार, खासदार, पालकमंत्री यांनी सुद्धा याला मंजुरी दिलेली आहे. परंतु यावर रेल्वेने कुठलीही कार्यवाही केलेली नव्हती. त्यामुळे बसपाने नागरिकांच्या माध्यमातून रेल रोकोसारखे आंदोलन करण्याचा इशारा दिला. ओव्हरब्रिज पाडताना अंडरब्रिजचे काम करावे.

मागील एक महिन्यापासून पाचपावली ओव्हरब्रिज पाडण्याचे काम सुरू आहे. या ब्रिजखाली 2 रेल्वे लाईन आहेत. त्यासाठी रेल्वे ब्लॉक आवश्यक आहे. रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ते मान्यही केले. विशेष असे की याच मार्गावर कावळपेठ अंडरब्रिज आहे. त्यामुळे हा ज्या दिवशी रेल्वे ब्लॉक होईल त्याच दिवशी कावळपेठ शांतीनगर येथील अंडरब्रिजचे बॉक्स टाकण्याचे काम करावे, जेणेकरून त्याला वेगळी कार्यवाही करण्याची गरज पडणार नाही, अशा प्रकारची माहिती बसपा नेत्यांनी रेल्वेचे डीन (अधिकारी) दीपक कुमार गुप्ता यांना देऊन याच मे महिन्यात पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करावे असे आवाहन केले. शिष्टमंडळ बसपाचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव पृथ्वीराज शेंडे, प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, जिल्हा प्रभारी रंजना ढोरे, जिला महासचिव चंद्रशेखर कांबळे, भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सचिव किरपाल यांच्या नेतृत्वात भेटले. शिष्टमंडळात अभिलेश वाहाने, उमेश मेश्राम, अंकित थूल, भानुदास ढोरे, नितीन वंजारी, प्रेम पाटील, अनिल खोब्रागडे, मनोज फटिंग, शेख पठाण यांचा प्रामुख्याने समावेश होता.

# चित्रविचित्र आडनावे नामकरण करणे ही काळाची गरज मुक्त संवादाचा सूर



**नागपूर :** सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध लोकांनी भागीदारी करून लोक कल्याणकारी कार्य करावे असे विलास गजभिये यांनी सांगितले. तर मुक्त संवाद साधताना निमंत्रितांसाठी चर्चा झाली. प्रा. भीमराव गायकवाड यांनी सांगितले की पूर्वीच्या काळामध्ये आपल्या पूर्वजांचे नाव हे चित्र विचित्र होते. ते आडनाव बदलविणे काळाची गरज आहे. त्याकरिता त्यांनी आपल्या स्वतःच्याच कुटुंबातील एक उदाहरण दिले. श्रीराम, राजाराम, रामचंद्र, तुकाराम, रामदास असे नाव होते. त्यानंतर डॉ. अशोकानंद देशभ्रतार यांनी विचित्र आडनाव कसे आपल्या समाजाचे होते, यावर भाष्य केले. कानफाडे, ढुकरमारे, बैलमारे, माणूसमारे, हाडके अश्या आडनावावरही त्यांनी प्रसंगी प्रकाश टाकला. तर चित्तरंजन चौरे यांनी भंडारा, गोंदिया जिल्ह्यामध्ये प्रत्येक गावात मेश्राम आडनाव आहेत असे सांगितले. परिवर्तन विचार मंच आयोजित बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे, कृषी संशोधक डॉ. एन. एम. निमगडे, दादासाहेब रूपवते जन्म शताब्दी निमित्ताने मुक्त चर्चा सिद्धार्थ कॉलेज, अजनी पोलीस स्टेशन नागपूर येथे झाली. कवी सम्मेलनच्या अध्यक्षस्थानी प्रा. भीमराव गायकवाड, संचालन संजय सायरे, डॉ. अशोकानंद चित्तरंजन चौरे, दिवाकर शिर्के, सुधा बामणपल्लीवार, प्रणोती कळमकर, संगीता बनकर आदीनी सहभाग घेतला. चर्चेमध्ये सहभागी झाले होते. संचालन संजय सायरे, आभार मालती वराडे यांनी केले.




## बोधिसत्व बुद्ध विहार, बकुताईनगर, खडगांव रोड, लावा, नागपूर.

बकुताईनगर खडगांव रोड लावा नागपूर. बोधिसत्व बुद्ध विहाराला जवळपास 15 वर्ष झाले आहेत. विहारात दररोज सायंकाळी 5.30 वाजता, रविवारी सकाळी 10.00 वाजता बुद्ध वंदनेचा कार्यक्रम होतो. पौर्णिमा /अमावस्या ला सायंकाळी 7.00 वाजता वंदना होते. सर्व महापुरुषांचे जयंती, संविधान दिवस कार्यक्रम पार पडतात. वर्षावास, भंतेजींचे प्रवचन, भोजनदान होत असते. शशांक रगभिये यांनी निर्मितीस विशेष सहकार्य केले आहे. सोनारे, फुलमाळी, बडगे, पाटील, संजय पाटील, सोनारे, श्रीधर गजभिये विशेष लक्ष देतात.

संवाद मित्र, सी. एन. शेंडे
मो. 9325636298

## महत्वाचे

### अंजलीला 10 वीत 95.20टक्के गुण



**हिंगोली :** असंघटीत बांधकाम कामगार आणि शेतमजुरी करणाऱ्या पांडुरंग नरवाडे यांच्या मुलीने अंजलीने 10 वीत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत 95.20टक्के गुण मिळवून गुणवत्ता ही कोणाची मक्तेदारी नाही हे सिद्ध करून दाखवुन दिले. पांडुरंग नरवाडे हे सत्यशोधक कामगार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष असून ते असंघटीत कामगार व शेतमजुरांच्या मुलामुलींना इमारत बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सतत जनजागृती करीत असतात.

### महाबोधी बुद्ध विहार मुक्ती समर्थनार्थ अ.जातीजमाती विकास परिषदेचे धरणे



**नागपूर :** महाबोधी बुद्ध विहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ राष्ट्रीय अनु. जाती जनजाती विकास परिषद, नवी दिल्ली (म.प्रदेश) यांच्या वतीने नागपूर येथील संविधान चौकात एक दिवसीय धरणे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाच्या माध्यमातून बिहारमधील बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्ध भिक्खूंच्या ताब्यात देण्याच्या मागणीसह बौद्ध धम्माच्या संरक्षण आणि प्रसारासाठी जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी अध्यक्ष इंजि. रवी सोमकुवर, डॉ. ऋषिकेश मेश्राम, प्रवीण पाटील, डॉ. मुकुंदा जोगेकर, डॉ. माया गायकवाड, सारिका वाघमारे, दिनेश वानखेडे, अरविंद दुपारे, चंद्रशेखर देशभ्रतार, संदीप नवनागे यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# देवलामेठी येथे अष्टधातु बुद्धमूर्तिचे अनावरण

**नागपूर :** बुद्ध घोष महाविहार थाईलँडवरुन आलेल्या अष्टधातु बुद्ध मूर्तिचे अनावरण अमरावती रोडवरील दवलामेठी येथे नुकतेच करण्यात आले. पंचवर्गीय भिक्षुंच्या उपस्थितीत उद्घाटनाप्रसंगी मुंबई येथील गोल्डमॅन रोहित पिसाल, अंबाझरी आयुध निर्माण एक्सजिकेटिव्ह डायरेक्टर अजय कुमार येरपुडे, जनरल मैनेजर एम. के. आर्य, मुकेशकुमार वर्मा (GM) आणि रोहितदेव वर्मा याप्रसंगी उपस्थित होते.



दीक्षाभूमीचे विश्ववस्त विलास गजघाटे, कमल किशोर जी. एम. आयुध निर्माण उपस्थित होते. हजारों वर्ष आमच्या आई बापाने गळ्यात गाडग बांधून फिरले. आता मी 1 किलो सोन्याची बुद्ध मूर्ति घालून फिरतो तर मनुवाद्यांची मन दुखतात असे प्रतिपादन रोहित पिसाल यानी केले. बुद्ध विहार प्रशिक्षणचे व रोजगाराचे केंद्र बनावे असे अजय कुमार यांनी संगीतले. ऑर्डनेंस फैक्ट्री, एंप्रेस मिल, मॉडल मिलमुळे नागपुरचा विकास झाला. असे विलास गजघाटे यानी संगीतले. प्रस्तावना शरद मेश्राम यांनी केले तर संचालन प्रवीण अंबादे यांनी केले तर आभार सुप्रिया धोटे यांनी केले तर स्वागत गुफा फाले, शोभा अंबादे, सुजाता कांबले, मीता मेंडे, कला मेश्राम, वैशाली रंगारी, भाग्यश्री शिवाडे, नीता गंवई, सुनंदा रामटेके, रश्मि पाटिल, मनीषा गर्ग, रुबिका बलवीर केले. यापरसंगी केवल वानखेड़े, रविंद्र कांबले, विशाल फाले, रवि गवई, रामचरण मेश्राम, राजेंद्र कांबले, प्रकाश सोनटके, डी. डी. गजभिए, संजय तिवारी, विजय ढोणे, श्याम चन्ने, सम्यक कांबले, सिद्धार्थ चन्ने, देवेश रंगारी, अभिषेक खडसे, दीक्षांत राउत, साकेत गवई, हनी वानखेडे, मयंक शेंडे, साहिल कांबले, आकाश मेश्राम यांची उपस्थिती होती.

# अंधश्रद्धा व व्यसनमुक्त राहून ज्ञानाचा संग्रह करा : गौरव आळणे




**नागपूर :** आदिम युथ फाऊंडेशन व हलवा समाज पारिवारिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांकरिता बाल विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरामध्ये 'अंधश्रद्धेची दुनिया.. विज्ञानाची किमया' अंतर्गत वैज्ञानिक प्रयोगाचे सादरीकरण करून विद्यार्थ्यांनी निर्व्यसनी जीवन जगून ज्ञानाचा कण कण गोळा करावा असा संदेश महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष तथा नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक गौरव आळणे यांनी सांगितला. यावेळी विद्यार्थ्यांना व्यसनाचे प्रकार, दुष्परिणाम व उपाय याची माहिती सचित्र दाखविण्यात आली.

यावेळी आदिवासी समाजातील वर्ग 7, 8 व 9 वी च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला शिबिराच्या आयोजनाकरिता आदिम संशोधन मंडळाचे प्रकाश निमजे, वासुदेव वाकोडीकर, ओमप्रकाश पाठराबे, रमेश बिजेकर, हरेश निमजे, बळवंत मेश्राम, प्रदीप पवनीकर, विष्णू भनारकर, सुधांशू खोब्रागडे, संघा बिजेकर, नारायण भाटघरे, धीरज, बारापात्रे, घनश्याम निखारे, देवेंद्र बोकडे आदींनी आयोजनाकरिता परिश्रम घेतले. बालविकास वीर 18 मे पर्यंत सुरू राहणार आहे.

# प्रयासी डंभारेच्या 'ध्येयवेडी रमाई' एकपात्री नाट्य प्रयोग

**नागपूर :** लहान वयापासूनच महामानवांच्या विचारांची रुजवणूक व्हावी आणि धम्म चळवळीसाठी भावी निष्ठावान कार्यकर्ते घडावे, या उदात्त हेतूने नागरी बँक कॉलनीतील लुंबिनी बुद्ध विहारात भीमोदय जयंती उत्सव समितीद्वारे आणि सामाजिक कार्यकर्ते प्रकाश कांबळे यांच्या पुढाकाराने 2016 पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीचे औचित्य साधून सातत्याने धम्म संस्कार शिबिराचे आयोजन केले जाते. याहीवर्षी या शिबिराचे आयोजन 5 मे ते 11 मे या कालावधीत संपन्न झाले आहे. याच शिबिरात प्रयासी डंभारे या 13 वर्षाच्या चिमुकलीने प्रा. राजेश डंभारे लिखित, अविनाश हलुले दिग्दर्शित आणि प्रणेती डंभारेने संगीतबद्ध केलेल्या मातोश्री रमाई आंबेडकर यांच्या त्यागमय आणि संघर्षमय जीवनाचे 'ध्येयवेडी रमाई' या एकपात्री प्रयोगाच्या माध्यमातून सादरीकरण केले. प्रयासीचा हा पहिलाच प्रयोग उपस्थित रसिकांची मने जिंकून गेला. प्रयासीने आपल्या या एकपात्रीच्या माध्यमातून ध्येयवेडी, खंबीर, सक्षम, समाजाप्रती तळमळणारी, काळजी करणारी, संकटांशी भिडणारी, त्यागमूर्ती, नेतृत्व करणारी, जबाबदारी स्वीकारणारी रमाई साकार केली. सुमारे अर्धा तास चालणाऱ्या या एकपात्री प्रयोगाला उपस्थित रसिकांनी मनापासून दाद दिली. या धम्म संस्कार शिबिरात सुमारे 75 शिबिरार्थी



विविध अंगाने आपले व्यक्तिमत्त्व विकसित करीत आहे. प्रयासीच्या एकपात्रीच्या आधी मार्शल उमेश गायकवाड यांनी शिबिरार्थ्यांकडून समता सैनिक दलाची परेड करून घेतली. मार्शल संजय ओरके यांनी 'आंबेडकरी संस्कृती निर्मितीत चित्र कवितेचे योगदान' डॉ. मुरलीधर बेलखोडे यांनी 'चला झाडांशी संवाद साधूया' या विषयावर शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन केले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी भीमोदय जयंती उत्सव समितीचे प्रमोद खेडकर, डॉ. प्रदीप थूल, प्रभाकर भगत, राजू वरके, महेंद्र डहाके, प्रकाश मून, सचिन वागदे, अनिल पाटील, विनय नागदिवे, सरला लामसोगे, क्षमा मुदावणे, सुनिता सहारे, प्रा. नागसेन बनसोड, सतीश डोंगरे, रमेश ढोके, धवणे गुरुजी, विजय थूल, गौतम कांबळे, प्रभाकर लोहकरे, पांडुरंग थूल, सुरेश कांबळे, रमेश भरणे इत्यादी पदाधिकारी आणि सदस्य यांनी विशेष सहकार्य केले आहे.



# वैशाख बौद्ध पौर्णिमा विविध संस्था संघटनांकडून साजरी!

## वटथाई इंडियन बुद्धिस्ट मोनेस्ट्री

**नागपूर :** प्रतापनगर मेन रोड मंजुळाबाई राहाटे लेआउट येथील वटथाई इंडियन बुद्धिस्ट मोनेस्ट्रीमध्ये पय्या मेत्ता संघचे संस्थापक अध्यक्ष पुज्य भदन्त संघरत्न मानके यांनी धम्म देसना प्रदान केली. वटथाई बुद्धिस्ट मोनेस्ट्रीला ऐतिहासिक वारसा लाभला असून पाच दशकांपासून थायलंडवरुन येणाऱ्या भीक्खूंना नागपूर विद्यापीठमध्ये शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी परिनिब्बुत थायलंडचे भदन्त धम्मविरानुपुत्त महास्थविर व नागपूर येथील पुज्य भदन्त सदानंद महास्थविर भदन्त धिरधम्म महास्थविर भदन्त संघसेन शास्त्री आचार्य भदन्त प्रज्ञापाल महास्थविर यांच्या श्रमसाफल्यातून 1986 साली स्थापन करण्यात आलेल्या संस्थेला उपरोक्त जागा मंजुळाबाई राहाटे यांनी दान केले. उपरोक्त कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मोनेस्ट्रीचे अध्यक्ष भदन्त नाग दिपंकर महास्थविर हे होते.



प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्ष डॉ. सिलवंस महास्थविर कोषाध्यक्ष भदन्त एन. सुगतबोधी महास्थविर सचिव भीक्खुणी सुर्या थेरी सदस्य भदन्त वन्नासारा भीक्खुणी संघमित्रा आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उर्वशी शंभरकर, नरेश लोखंडे, रवि नितनवरे, अजय मेश्राम, गिता लोखंडे, प्रतिभा डोंगरे, अल्का मेश्राम, राहुल मेश्राम, लिना काटकर, ममता वानखेडे, डि. डब्लु. सुखदेवे, डॉ. संजिव चहांदे, सुप्रिया शंभरकर, नंदा शंभरकर, निर्मला ढोले, दिनेश बोरघाटे, मिलिंद अंधारे, कल्पना मेश्राम, ज्योती सुर्यवंशी, सुधा राहटे, गौतमी राहाटे आदींचा सहभाग राहिला.

## तथागत बुद्ध विहार, काशीनगर कँडल मार्च

**नागपूर :** तथागत बुद्ध विहार, तथागत अभ्यासिका व तथागत बचत गट यांच्या संयुक्त विहारातर्फे सामुहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. नंतर कँडल मार्च दोन दोनच्या रांगेमध्ये विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शताब्दी चौकात येऊन त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आली. शताब्दी चौकातून रॅली निघून महा कारूणिक तथागत गौतम बुद्ध पुतळ्याजवळ येऊन थांबली. या रॅलीचे वैशिष्टय म्हणजे बुद्धं शरणं गच्छामी च्या जयघोषात शांततेने सर्वांच्या हातामध्ये पंचशील झेंडा आणि जळत्या मेणबत्या घेऊन रॅली बुद्धांच्या पुतळ्याजवळ येऊन महिला मंडळांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले आणि सामुहिक बुद्ध वंदना घेण्यात आली.

तथागत बुद्ध विहाराचे पदाधिकारी नानाजी ढेंगरे, सिंधु स्थूल, कुमूद गाणार, पद्माकर गणवीर, राहूल परुडकर, कांबळे, नंदा झोडापे यांनी कँडल मार्च सुंदर रित्या मार्गदर्शन पार पाडला. शताब्दी चौकात खीर वाटप करून रॅलीचे समापन करण्यात आले.

## बहुजन मैत्री संघ



**नागपूर :** आंबेडकर जयंती, बुद्ध जयंती आणि प्रत्येक पोर्णिमाच्या निमित्याने नरेंद्र नगर बहुजन मैत्री संघ हे विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम, स्पर्धा परीक्षाचे आयोजन करत असतात. स्पर्धा परीक्षेतील यशस्वितांना दरवर्षी बुद्ध-फुले-आंबेडकरी साहित्यावर आधारित पुस्तके व स्मृतिचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात येत असते. यावर्षी सुद्धा 11, 12 मे 2025 ला बुद्ध जयंती निमित्त विविध स्पर्धात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यात बुद्ध आणि त्यांचा धम्म, महामंगल सुत्त, धम्मपालन गाथा यावर आधारित प्रश्नोत्तरी परिक्षा, पाली भाषा अभिवादन स्पर्धा परीक्षा झाल्या. यापूर्वी डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या सर्व स्पर्धकांना विविध पारितोषिके, स्मृतिचिन्ह प्रदान करून त्यांना सन्मानित करण्यात आले. वैशाख पोर्णिमेच्या प्रासंगिकतेवर डॉ. सरोज आगलावे यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रसंगी सम्यक म्युझिकल ग्रूप, मनीष नगर यांचा बुद्धभीम गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. 'धम्मज्ञानासाठी पाली भाषेचे महत्व आणि आजची गरज' यावर अनिल ढाले यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभू राजगडकर होते. वरील सर्व कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कला सुधाकर दूबे, व्ही. पी. वाघमारे, डॉ. सिद्धार्थ लभाणे, प्रा. घनशाम धाबर्डे, सविता अशोक बहादुरे, लता भगीरथ मेश्राम, सिद्धार्थ गायकवाड, सुजाता निकोसे, अरुण रामटेके, भारती रामटेके, वर्षा गजभिये, सुशीला गेडाम, इ. सभासदांनी प्रयत्न केले. स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमात अनेक गणमान्य व्यक्ती उपस्थित होते.

## ग्रीन प्लॅनेट कॉलनी, ओंकारनगर




**नागपूर :** साज्योती बहुउद्देशीय संस्थेतर्फे ग्रीन प्लॅनेट कॉलनीमध्ये मोठ्या उत्साहात वैशाख बुद्ध पौर्णिमा साजरी करण्यात आली. तथागत गौतम बुद्ध व परमपूज्य डॉ. बाबासाहेब भिमराव आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमात अध्यक्ष नथुजी कांबळे व प्रमुख अतिथी डॉ. रमेश राठोड आणि सुभाष बोंदाडे तसेच आशिष नागपुरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भीम गीताने ईश्वर राऊत यांनी केली. त्यानंतर डॉ. रमेश राठोड यांनी प्रबोधन केले. त्यानंतर या कार्यक्रमाच्या सन्मानमूर्ती सावी श्रीकांत बुलकुंडे यूपीएससी परीक्षेत तिला मिळालेल्या उत्तुंग यशासाठी साज्योती बहुउद्देशीयन संस्थेअंतर्गत तसेच ग्रीन प्लॅनेट कॉलनी तर्फे मनीष सोमकुवर डॉ. दीपक थेटे आणि मंजुषा जीवनतारे व दीपक मून यांनी सन्मानचिन्ह, रोपटे आणि पंचशील दुपट्टा देऊन सन्मानित केले. सावी बुलकुंडे यांनी अतिशय मोलाचे मंत्र सांगितले. त्यानंतर सुभाष बोंदाडे यांनी प्रबोधन केले. तसेच या कार्यक्रमांमध्ये या दहावी आणि बारावीमध्ये विशेष गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमात वर्धिनी जिवनतारे हिने सुंदर नृत्य प्रदर्शन केले. तसेच वर्णिका दहीकर हिने वैशाख पौर्णिमेचे महत्व आपल्या भाषणांत सांगितले आणि शनवीता दहीकर माता रमाईचा जीवनपट, माता रमाईच्या वेशभूषा घालून सांगितला. छत्रपती शेंडे यांनी भीम गीत गायले. कार्यक्रमाचे संचालन स्वाती थूल हिने केले. आभार प्रदर्शन डॉ. मेश्राम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी चंद्रशेखर सवाईथुल, वर्षा सवाईथूल, दिलीप मून, जीवनतारे, एस. गोसावी, जितेंद्र मेश्राम, ज्योती पाटील, शोभना राऊत, शीतल पोफरे, इंदु कांबळे, सरोज गोसावी, पद्मा थेटे, वर्षा उके, वर्षा पात्रा, जानवी सोमकुंवर यांनी सहकार्य केले.

## धम्मेक बुद्ध विहार



**नागपूर :** धम्मप्रचरक सुनील लोखंडे यांनी बुद्ध पौर्णिमा ही त्रिगुणी कशी यांचे महत्व सांगितले. त्यानंतर गुलशन बौद्ध यांनी परित्राण पाठ सत्यनारायण नाही, हे पटून सांगितले. पुष्प पूजा, धूप पूजा ही मानवी जीवनाची स्थिती आहे. अगदी सुंदर आणि टवटवीत दिसणारे पुष्प काही वेळाने कोमेजून जात असतात. तसेच मानवी जीवन आहे. मेणबत्ती अगरबत्ती स्वतः जळून आपणास प्रकाश देत असते. अगरबत्ती स्वतः जळून आपणास सुगंध देत असते. असा बोध घेतला पाहिजे. धोंगडे यांनी दान पारमिता यांचे महत्व पटवून दिले. वासुदेव डोंगरे यांनी भाषण केले. विहाराच्या अध्यक्ष कृष्णा लिंगायत यांनी बुद्ध गीताने कार्यक्रमाचा शेवट करून सर्वाचे आभार मानले. सर्व पाहुणे यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम संपल्यानंतर मुख्य कार्यक्रम सुरू झाली. डॉ. सविता कांबळे यांनी पाली साहित्य आणि त्यांचे महत्व या विषयावर विचार पेरले. तसेच सुनंदा रायपुरे यांनी दुःख मुक्तीचा मार्ग म्हणजे पंचशील, अष्टांगिक मार्ग आणि दहा पारमिता याचे महत्व विषद केले. लहान मुलांना बक्षीस वितरण झाले. के. एल. लिंगायत, यशवंतराव गजभिये, गुरुदेव मेश्राम, प्रा. देवानंद कांबळे यांनी संचालन केले. गुरुदेव मेश्राम यांनी आभार मानले, मनिषा मेश्राम यांनी प्रस्ताविक केले. उद्याचा प्रबुद्ध भारत या विषयावर विक्की बेलखोडे यांनी भाषण केले. फारच सुंदर आणि महत्त्वाचे विचार पेरले.

## आकार युवा समता फाऊंडेशन व सुदत्त बुद्ध विहार

**नागपूर :** सुदत्त बुद्ध विहार, लोखंडे नगर, नागपूर येथे त्रिगुणी पावन बुद्ध पौर्णिमेच्या आदल्या दिवशी आकार युवा समता फाऊंडेशन ग्रूप व सुदत्त बुद्ध विहाराच्या संयुक्त विद्यमानाने परिसरातील शिकणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांसाठी, विविध शैक्षणिक स्तरात व स्पर्धा परीक्षांमध्ये, कसा अभ्यास करावा व परीक्षेला कसे समोर जावे याबद्दल मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने कल्याणी हुमणे पोलीस निरीक्षक, विक्रम बोरकर, चार्टर्ड अकाउंटंट डॉ. आकाश खोब्रागडे सह प्रशांत चव्हाण हे उपस्थित होते व त्यांनी जगातील विविध युनिव्हर्सिटीमध्ये कसे प्रवेश घ्यायचा याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच सीए परीक्षा कशी पास करायची, त्याकरता लागणारी चिकाटी कशी कायम ठेवायची हे सुद्धा मुलांना सांगण्यात आले व भारतातील महाराष्ट्रातील, विविध स्पर्धा परीक्षा पास करण्याकरता कोणते स्किल वापरावे याबद्दल पोलीस निरीक्षक हमने यांनी मार्गदर्शन केले.



याच शिबिरात जपान टोकियो येथे कार्यरत व नव्याने विवाह बद्ध झालेले इंजि. अनय बडवणे (आयआयटी मद्रास) व शोको बडवणे जपान टोकियो यांचा विदेशात परीक्षा देऊन नोकरी करीत असल्याबद्दल सत्कार करण्यात आला. जेणेकरून उपस्थित विद्यार्थ्यांना सुद्धा विदेशात जाऊन चांगल्याप्रकारे नोकरी कशा मिळवता येईल याबद्दल प्रोत्साहन मिळावे. अनय बडवणे, हे इंजि. शुद्धोधन बडवणे निवृत्त कार्यकारी अभियंता व राष्ट्रीय अध्यक्ष पारिवारिक संस्कार समिती राष्ट्रीय बौद्ध महासभा, यांचे पुत्र आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाच्या अध्यक्ष, सचिव कोषाध्यक्ष सहसचिव व इतर सदस्यांनी सहकार्य केले. तसेच प्रामुख्याने सौरभ जामगडे व सहकारी सर्व मित्र कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रम घेतले. तसेच बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी भंते नाथापूण्ण यांच्या उपस्थित बौद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने परित्राण पाठ व संबोधनाचे कार्यक्रम महिला मंडळाच्या सहकार्याने घेण्यात आली.

## रमाई स्मारक बौद्ध मंडळ उंटखाना



**नागपूर :** रमाई स्मारक बौद्ध मंडळ उंटखाना नागपूरच्या वतीने बुद्ध पौर्णिमा व बुद्ध जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बुद्ध जयंतीच्या निमित्ताने अष्टांगिक मार्ग व चार आर्यसत्य यावर बुद्ध उपासक विचारवंत इंजि. भूषण मून यांनी अष्टांगिक मार्ग व चार आर्य सत्य यावर बुद्ध पौर्णिमेचा महत्व. बुद्धाने सांगितलेला अष्टांगिक मार्ग जीवनातील दुःख निवारण करण्याकरता फार उपयोगी आहे. माझी न्यायमूर्ती नरेश बनसोड यांनी संविधानाचे महत्त्व व डॉ. आंबेडकरांनी संविधानामध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय या गोष्टीचा समावेश केला ते सर्व विचार बुद्धतत्त्वजनातील आहेत असे सांगितले. संविधान परिवाराचे मुख्य संयोजक प्राध्यापक राहुल मून यांनी डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या 22 प्रतिज्ञांचे वाचन केले व संविधानाच्या प्रस्तावनाचे सुद्धा वाचन करण्यात आले. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपासक-उपासिका उपस्थित होते. रमाई बुद्ध विहार कमिटीचे अध्यक्ष प्रतिमा मून, सचिव उषा चहांदे, उपाध्यक्ष शालिनी डोंगरे, विजया गायकवाड, लीला तामगाडगे, माया कांबळे, प्रतिभा गोटेकर, सुजाता सुके, शोभा वाणी, माजी नगरसेविका सुजाता कोंबाडे, लता नगराळे, सुरेश मून, डॉ.सतीश मेश्राम, आम्रपाली कांबळे, केवल कांबळे, राजेंद्र गणवीर, चंद्रमणी उके, सुनिता उके, सुरेश गाणार, ॲड. प्रणिता मून, पराग मून इत्यादी अनेक उपासक-उपासिका उपस्थित होते.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648